# ‘महादेवीला परत आणण्यासाठी संयुक्त याचिका दाखल करणार’



**कोल्हापूर** : मागील काही दिवसांपासून महादेवी हत्ती परत मिळावी यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात आंदोलन सुरू आहे. याबाबत आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. वनतारा रेस्क्यू सेंटरचे सीईओ विवान करानी यांनी बुधवारी (दि. ६) नांदणी येथील मठाचे महास्वामी यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन घोषणा केली की, महादेवी हत्तीणीला येथे परत आणण्यासाठी नांदणी मठ, वनतारा आणि राज्य सरकार मिळून सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करणार आहोत. आम्ही याचिकेत वनतारामध्ये हत्तीसाठी जी व्यवस्था आहे तीच या मठात करणार असल्याची माहिती देऊ. ही याचिका पेटा आणि एचपीसी यांच्या पाठिंब्याने दाखल करणार आहोत. सुप्रीम कोर्टाचा जो आदेश आला त्यावर आम्ही काम करत होतो. सगळ्यांनी समजून घेतल्याबद्दल आभारी आहे, असेही करानी म्हणाले.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २१
www.ramprahar.com

गुरुवार ७ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

खोपोलीतील कारखान्यात अपघात; कामगाराचा मृत्यू/२
थेरोंडा-पालवदरम्यानचा साकव कोसळला/५
कसोटी क्रमवारीत सिराजची मोठी झेप!/८





# माथेरानच्या समस्या सोडवण्यासाठी बैठक

### मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्यासोबत सकारात्मक चर्चा

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळ माथेरान येथील विविध समस्यांच्या सोडवणुकीबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीनुसार महाराष्ट्र राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. ६) मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक झाली.

या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, संबंधित विभागाचे अधिकारी, माथेरानचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, भाजप माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी, राजेश चौधरी, माजी नगरसेवक संदीप कदम, सुनील शिंदे, शकील पटेल, रूपेश गायकवाड, मिलिंद कदम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

माथेरानच्या विकासासाठी रोप वे, फ्युनिक्यूलर रेल्वे, पायवाट व्यवस्थापन, वस्तू वाहतूक, पर्यटक सुविधा, कायदेशीर मदत इत्यादी बाबींवर राज्य शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. त्या अनुषंगाने ही बैठक सकारात्मक झाली.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते कर्तव्य भवनाचे उद्घाटन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीतील कर्तव्य पथ येथे कर्तव्य भवनाचे उद्घाटन झाले. या भवनाची रचना राजधानीत विखुरलेल्या विविध मंत्रालये आणि विभागांना एकत्र आणून कार्यक्षमता, नाविन्य आणि सहकार्याला चालना देण्यासाठी करण्यात आली आहे.



आतापर्यंत कर्तव्य भवनची तिसरी इमारत पूर्ण झाली आहे. इमारती क्रमांक १ आणि २ या महिन्याच्या अखेरीस तयार होण्याची अपेक्षा आहे. हा प्रकल्प सेंट्रल व्हिस्टा पुनर्विकासाचा एक भाग आहे, ज्यामध्ये नवीन संसद, नूतनीकरण केलेले कर्तव्य पथ आणि इतर सरकारी इमारतींचा समावेश आहे.

सध्या अनेक केंद्रीय मंत्रालये १९५० ते १९७०दरम्यान बांधलेल्या शास्त्री भवन, कृषी भवन, उद्योग भवन, निर्माण भवन इत्यादी जुन्या इमारतींमधून चालतात. या इमारती आता जुन्या झाल्या आहेत आणि चांगल्या स्थितीत नाहीत.

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहारमंत्री मनोहरलाल खट्टर आणि गृहनिर्माण मंत्रालयाचे सचिव कटिकीथला श्रीनिवास यांच्यासमवेत पंतप्रधानांनी नव्याने बांधलेल्या इमारतीचा दौरा केला. हे भवन सुमारे १.५ लाख चौरस मीटर क्षेत्र व्यापते आणि त्यात दोन तळघर आणि सात मजले (तळ+सहा मजले) समाविष्ट आहेत.



## मच्छीमारांच्या मागण्यांसंदर्भातही मुंबईत बैठक

**मुंबई** : अलिबाग तालुक्यातील बहिरेश्वर मत्स्यव्यवसाय विकास मच्छीमार सहकारी संस्था धेरंड मर्यादित मच्छीमार संघटनेच्या विविध मागण्यांसंदर्भात राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील यांच्यासह मच्छीमार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सुधागड दरोड्यातील सहा आरोपींना अटक

**अलिबाग, पाली : प्रतिनिधी**

पाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत हातोंड बौद्धवाडा आणि गोंदावा येथे टाकण्यात आलेल्या सशस्त्र दरोड्यातील सहा आरोपींना रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अटक केली. एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे तसेच गुन्ह्यातील मुद्देमाल परत मिळवण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी बुधवारी (दि. ६) पत्रकार परिषदेत दिली.

अजय एकनाथ चव्हाण, (वय २३, रा.आसरे, ता.खालापूर), आकाश पंजाबराव चव्हाण (२०, होराळे, वावोशी), सुदनिल प्रकाश चव्हाण (३२, कात्रज, पुणे), मल्हारी भानुदास चव्हाण (३०, भिलवली, खालापूर), सोमनाथ भानुदास चव्हाण (३०, भिलवली, खालापूर), सुजल महेश चव्हाण, (१९, खोपोली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या आरोपींवर मुंबई, ठाणे, नाशिक, बुलढाणा, परभणी येथे गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून आणखी अशाच प्रकारचे दोन गुन्हे केल्याचे मान्य केले आहे. गुन्ह्यातील मुद्देमाल कुठल्या ठिकाणी विकला याची माहिती मिळाली असून तो परत मिळवण्याची कार्यवाही सुरू आहे. **(पान २ वर..)**

## निवडक

### उत्तराखंडमध्ये महाराष्ट्रातील सर्व ५१ पर्यटक सुरक्षित

**मुंबई :** उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशीतील धराली परिसरात ढगफुटी होऊन चार जणांचा मृत्यू, तर अनेक बेपत्ता आहेत. महाराष्ट्रातील पर्यटक उत्तरकाशीमध्ये अडकले होते. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ११, सोलापुरातील चार आणि इतर जिल्ह्यांतील ३६ अशा एकूण ५१ पर्यटकांचा समावेश असून हे सर्वजण सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली. अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी महाराष्ट्र सदन, दिल्ली यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

### रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या १८ विशेष गाड्या

**मुंबई** : रक्षाबंधन आणि स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर लांब सुट्ट्यांदरम्यान प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वे १८ विशेष ट्रेन चालवणार आहे. चालवण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते नागपूर सहा सेवा, लोकमान्य टिळक टर्मिनस ते मडगाव चार सेवा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कोल्हापूर दोन सेवा आणि पुणे ते नागपूर सहा सेवा यांचा समावेश आहे.



# पनवेल तालुक्यात विकासकामांचा झंझावात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांचा झंझावात सुरू आहे. अशाच प्रकारे तालुक्यातील विकासात्मक कामांचा उद्घाटन सोहळा मंगळवारी (दि. ५) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला होता. या वेळी वलप, वाकडी, आंबिवली आणि आकुर्ली येथील कामांचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमांना भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, सरचिटणीस अंकुश पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, नरेश पाटील, आकुर्लीचे सरपंच सचिन पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, चिटणीस यतीन पाटील, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, नारायण खाडेकर, हरिश्चंद्र खाडेकर, स्वामी पाटील, किरण पाटील, बाळाराम पाटील, सोपान खाडेकर, सचिन पाटील, अंकुश पाटील, ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र पाटील, मच्छिंद्र पाटील, सदाशिव पाटील, जयेंद्र पाटील, संदीप नाईक, विनोद पाटील, चंद्रकांत पाटील, मयूर कदम आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# पालीत भाजपची दोन लाखांची दहीहंडी

### गोविंदा पथकांना विनामूल्य प्रवेश

**पाली : प्रतिनिधी**

दहीहंडी सणाचे वेध सर्वांना लागले आहेत. याकरिता गोविंद पथकांचा उत्साह शिगेला पोहचला असून पुरुषांबरोबर महिलांनीही जोरदार सरावाला सुरुवात केली आहे. यंदा पाली येथील दहीहंडी उत्सावात विजेत्या गोविंदा पथकास दोन लाख २२ हजार २२२ रुपयांचे रोख पारितोषिक, आकर्षक चषक तसेच इतर बक्षिसांची खैरात होणार आहे.



दहीहंडीचा सण १६ ऑगस्ट रोजी आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते प्रकाश देसाई यांच्या संकल्पनेतून पाली येथे भाजपच्या वतीने भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात भाजप पाली सुधागड मध्यवर्ती कार्यालयात बुधवारी (दि. ६) प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक झाली.

या बैठकीस भाजप नेते प्रकाश देसाई, राज्य परिषद सदस्य दादा घोसाळकर, आलाप मेहता, विठ्ठल सिंदकर, श्रीकांत ठोंबरे, **(पान २ वर..)**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते माहिती पुस्तिकेचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६च्या शाखा माहिती पुस्तिकेचे प्रकाशन बुधवारी (दि. ६) ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत व वाय. टी. देशमुख, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, राहुल घरत, दर्शन ठाकूर, किशोर पाटील, रघुनाथशेठ देशमुख, ‘रयत’चे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, दोन्ही विद्यालयाच्या प्राचार्य अनुक्रमे ज्योत्स्ना ठाकूर व सायली वडवलकर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील व प्रणिता गोळे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, अविनाश कजबजे, चारुशीला ठाकूर, कलाशिक्षक गणेश भोईर, ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत, करूणा तांडेल, डॉ. सुवर्णा किर्लोस्कर, जयराम सोनटक्के, अर्चना पाटील, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे उपशिक्षक अविनाश कजबजे, राहुल म्हात्रे यांच्यासह दोन्ही विद्यालयाचे सेवक उपस्थित होते.

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेचा व गव्हाण विद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा अभिमान असल्याचे सांगून या विद्यालयाच्या भौतिक सुविधांसाठी आपण सतत तत्पर असल्याचा निर्वाळा देत ’रयत’ ही आमची मातृसंस्था असल्याच्या गौरवशाली भावना व्यक्त केल्या तसेच दोन्ही विद्यालयांच्या स्थापनेपासून केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.



# उत्तराखंडमध्ये अडकलेल्या भाविक, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पावले

## राज्य सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून

**मुंबई : प्रतिनिधी**

उत्तराखंड राज्यात उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या ढगफुटीच्या घटनेमुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना राज्यात सुखरूप परत आणण्यासाठी राज्य सरकार युद्धपातळीवर प्रयत्न करत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उत्तराखंड राज्याचे सचिव (वित्त) दिलीप जवळकर, पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) निलेश भरणे यांच्याशी संपर्क साधून महाराष्ट्रातील पर्यटकांना तातडीने आवश्यक ती मदत पुरवण्याची विनंती केली आहे. प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे हीच प्राथमिकता आहे.

अडकलेल्या पर्यटकांमध्ये नांदेड जिल्ह्यातील ११ आणि इतर जिल्ह्यातील ४० अशा एकूण ५१ पर्यटकांचा समावेश आहे. त्यांना आवश्यक ती मदत करण्यासाठी राज्य शासन तत्पर असून पर्यटकांशी सतत संपर्क साधत आहे. उत्तराखंडच्या प्रशासनाशी सुद्धा राज्य शासन सातत्याने संपर्कात असून अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी व त्यांना महाराष्ट्रात लवकरात लवकर परत आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. आवश्यकतेनुसार राज्यातील जिल्हा प्रशासनाला सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक**

१) राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र
माहितीसाठी संपर्क: ९३२१५ ८७१४३/ ०२२-२२०२७९९०/ ०२२-२२७९४२२९

२) राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, उत्तराखंड
संपर्क ०१३५-२७१०३३४/८२१८८६७००५

# आमदार चित्रा वाघ यांनी नमुंमपा घणसोली निवारा केंद्राची केली पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**



महानगरपालिकेच्या समाजविकास विभागामार्फत कार्यान्वित घणसोली येथील बेघर निवारा केंद्र निराधारांचा आसरा म्हणून ओळखले जाते. या केंद्रास आज महाराष्ट्र विधान परिषद सदस्य आमदार चित्रा वाघ यांनी भेट देत तेथील कामकाजाची पाहणी केली व समाधान व्यक्त केले. याप्रसंगी नमुंमपा समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे व कोपरखैरणे पोलीस स्टेशनचे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उन्मेश थिटे उपस्थित होते.

या भेटी दरम्यान आ.चित्रा वाघ यांनी बेघर निवारा केंद्रात राहणाऱ्या लाभार्थी महिलांसोबत संवाद साधून बेघर निवारा केंद्रात मिळत असलेल्या सोयी सुविधांबाबत विचारणा केली. यावेळी त्या महिलांनी सकाळी नाश्ता, दुपारी व रात्री जेवण तसेच आरोग्याची तपासणी व औषधोपचार वेळच्या वेळी केला जातो असे अभिप्राय दिले. या महिलांसोबत चर्चा करताना चित्रा वाघ यांनी या महिलांची पार्श्वभूमी जाणून घेतली तसेच बेघर निवारा केंद्रात येण्याची कारणे समजून घेतली.

यावेळी त्यांनी बेघर निवारा केंद्रातील इतर व्यवस्थांचीही पाहणी केली. याठिकाणी पूर्णवेळ सुरक्षा रक्षक तैनात असतात तसेच येथील सीसीटीव्ही कॅमेरे व्यवस्थितरित्या कार्यरत असल्याने याठिकाणी महिला सुरक्षित असल्याची भावना व्यक्त केली. इतर सदस्यांसह लवकरच बेघर निवारा केंद्रास भेट देणार असल्याचे सांगून त्यांनी महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बेघर निवारा केंद्र उत्तम प्रकारे सुरु असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी लाटांमुळे गणेश विसर्जनाच्या रॅम्पची मोडतोड

## ✻ गणेशोत्सवापूर्वी दुरूस्त करण्याची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**



यावर्षी ज्येष्ठ व आषाढ महिन्याच्या अमावस्या व पौर्णिमेला लाटांचा जोरदार मारा श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती झाला. या काळामध्ये उधाणाची मोठी भरती असल्यामुळे लाटांचे पाणी धूप प्रतिबंधक बंधारा ओलांडून किनारपट्टीच्या भागात आल्याचे पाहायला मिळाले. श्रीवर्धन येथील जीवना बंदर या ठिकाणी मोठ्या स्वरूपाची जेट्टी बांधण्यात येत आहे. त्यासाठी त्या ठिकाणी संबंधित विभागाकडून खूप मोठ्या प्रमाणात दगड, माती, मुरूम याचा भराव करण्यात आला आहे.

त्याचा परिणाम श्रीवर्धन किनारपट्टीवर पाणी पातळीत वाढ झाल्याचे दिसून येते. श्रीवर्धन समुद्र किनारी सुशोभीकरण केलेल्या धुप प्रतिबंधक बंधाऱ्यावरून समुद्रकिनाऱ्याकडे उतरण्यासाठी पायऱ्या बांधण्यात आल्या होत्या. त्याही लाटांच्या माऱ्यामुळे पूर्णपणे उखडून गेल्या आहेत. तर गणेश विसर्जन करण्यासाठी बांधण्यात आलेले रॅम्प देखील पूर्णपणे तुटून गेला आहे. समुद्राच्या पाणी पातळीत खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.

यामुळे यावर्षी गणेश विसर्जनाच्या वेळी देखील समुद्राचे पाणी मागे न गेल्यास भाविकांना गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी अडचण उद्भवणार आहे. ज्यावेळी धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यात आला त्यावेळी बांधण्यात आलेले रॅम्प गणेश विसर्जनाच्या वेळी कमी पडू लागल्याने सदर रॅम्पची लांबी वाढवण्यात आली होती. परंतु सदरची लांबी वाढवत असताना खाली केलेल्या दगडी भरावामध्ये खडी, सिमेंटचे प्रमाण कमी वापरले गेल्याने लाटांच्या माऱ्याने खालील भराव वाहून गेल्याने सदरचा रॅम्प तुटून गेला आहे. सदर रॅम्पची दुरुस्ती करून घ्यावी. जेणेकरून भाविकांना गणेश विसर्जन करताना अडचण येणार नाही.

# 'सीकेटी'च्या एनएसएस विभागातर्फे वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'झाडे लावा दारोदारी समृद्धी होईल घरोघरी' या उक्तीस अनुसरून पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील एनएसएस विभागातर्फे वांगणी (नेरे) गावात वृक्षारोपण मोहीम राबविली गेली. या वृक्षारोपण मोहिमेत बेरडा, आवळा, करंज, जांभूळ, सुपारी, नारळ यासारखी ३० झाडे लावण्यात आली.

या वृक्षारोपण कार्यक्रमास चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक कैलास सत्रे, मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, पर्यवेक्षक अजित सोनवणे उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या तसेच एनएसएस विद्यार्थी स्वयंसेवकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

सदर वृक्षारोपण मोहीम यशस्वी करण्यासाठी मराठी माध्यमिक विभागाचे ग्रंथपाल सूर्यकांत घोडेकर, वांगणीचे माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, सहाय्यक शिक्षक भानुदास नवले तसेच एनएसएस युनिटचे कार्यक्रम अधिकारी गणेश पाटील, निखिलेश देशमुख, संगीता देशमुख, विवेक पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# अलिबाग नगर परिषदेकडून शहरात पीओपी गणेशमूर्ती नकोच असे बॅनर लावल्याने संताप

**अलिबाग : प्रतिनिधी**




पीओपी गणेशमुर्तींवरील विक्रीवरील निर्बंध उठवण्यात आले असले तरी अलिबाग नगरपरिषदेकडून शहरात ठिकठिकाणी पीओपी गणेमुर्ती नकोच अश्या आशयाचे बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामुळे मुर्तीकार आणि गणेश भक्तामध्ये संताप आहे.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. गणेशमुर्तींवर अखेरचा हात फिरवण्याची लगबग कार्यशाळांमध्ये सुरू आहे. गणेशमूर्तींचे गाव म्हणून नावारूपास आलेल्या पेण मधून लाखो गणेशमुर्ती देशाविदेशात पाठवण्यात आल्या आहेत. पीओपी गणेशमूर्तींच्या विक्रीवरील निर्बंधांचा ढग दूर झाले आहेत. या मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. असे असले तरी अलिबाग नगरपरिषदेमार्फत शहरात ठिकठिकाणी पीओपी गणेशमूर्ती नकोच अशा आशयाचे बॅनर लावण्यात आले आहेत. महत्वाची बाब म्हणजे उच्च न्यायालयाकडून पीओपीच्या गणेशमूर्तींच्या निर्मिती, खरेदी आणि विक्रीवर बंदी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गणेशभक्त आणि मुर्तीकारांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

उत्सवप्रिय कोकणात गणेशोत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो. घरोघरी लाडक्या गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. मोठ्या भक्तीभावाने गणेशाची आराधना केली जाते, मात्र नगरपालिकेच्या बॅनरबाजीमुळे पीओपीच्या गणेशमूर्तींबाबत संभ्रम निर्माण होत आहे. न्यायालयाने पीओपी मूर्तींच्या विक्री आणि वितरणावरचे निर्बंध हटवले आहेत. केवळ पीओपीच्या सहा फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये विसर्जन करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. अशा वेळी अलिबागच्या नगरपरिषदेकडून पीओपी मूर्ती नकोच असा आग्रह करणे योग्य नसल्याचे मत मूर्तीकार आणि विक्रेत्यांकडून व्यक्त केले जात आहे.

पान १ वरून

## सुधागड दरोड्यातील सहा आरोपींना अटक



२६ मे २०२५ रोजी पाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत हातोंड बौद्धवाडा व गोंदावा येथे घरांवर सशस्त्र दरोडा टाकण्यात आला होता. यात सहा ते सात घरांना लक्ष्य करून घरातील व्यक्तींना शस्त्रांचा धाक दाखवून दागिने, पैसे आदी वस्तू लुटून नेल्या होत्या. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी गुन्ह्याचा तपास करण्याचे आदेश दिले. त्यासाठी १० पथके तयार करण्यात आली व वेगवेगळ्या ठिकाणी पाठवली होती. या पथकांनी गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून सर्व सहा आरोपींना एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेतले.

यातील एक आरोपी टेंपोमधून खेडेगावात भाजी विकण्याचा व्यवसाय करतो. हा भाजीचा व्यवसाय करीत असताना गावातील घरांमध्ये कुणी वयस्क व्यक्ती आहे का, महिलांच्या अंगावर कुठले दागिने आहेत याची रेकी करत असे. त्यानंतर कुठल्या घरावर दरोडा टाकायचा याचे नियोजन केले जात होते, असे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधिक्षक अभिजीत शिवथरे रोह्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिलींद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, मानसिंग पाटील, उपनिरीक्षक लिंगप्पा सरगर, पाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शेरेकर, उपनिरीक्षक शिंदे, निकम, गोसावी आणि कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

## पनवेल तालुक्यात विकासकामांचा झंझावात

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या यांचा विकास निधी आणि पाठपुराव्यातून एमएमआरडीएच्या निधीमधून आकुर्ली गावातील मेन डीपी रोड ते ग्रामपंचायत तसेच हनुमान मंदिरपर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे उद्घाटन, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीमधून आंबिवली गावातील मुख्य रस्त्याचे काँक्रीटीकरण, मुख्य रस्ता ते गणपती विसर्जन तलावापर्यंत कच्च्या रस्त्याचे काम, आंबिवली मुख्य रस्त्यावरील मोरीचे आरसीसी, अंगणवाडीचे आरसीसी बांधकाम, मुख्य रस्ता ते सील आश्रम काँक्रीटीकरण, वाकडी आदिवासीवाडीतील अंतर्गत रस्ता आणि वलप येथील एमआयडीसी रस्त्यावरील पुलाचे उद्घाटन करण्यात आले.

## पालीत भाजपची दोन लाखांची दहीहंडी

प्रणाली शेठ, आरिफ मणियार, शिरीष सकपाळ, रोहन दगडे, बळीराम जाधव, राजेश गोळे, राकेश ठाकूर, वासुदेव मराठे, सुजित बारस्कर, समृद्धी बारस्कर, भास्कर पार्टे, हरिश्चंद्र पाटील, राकेश कानडे, प्रथमेश पोकळे, संजय कडू, वैभव जोशी, अरविंद फणसे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी दहीहंडी महोत्सवाचे स्वरूप, रूपरेषा व नियोजनाबद्दल चर्चा करण्यात आली.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकास दोन लाख २२ हजार २२२ रुपयांचे रोख पारितोषिक, आकर्षक चषक व इतर बक्षिसांची खैरात होणार आहे. सात थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांसाठी १० हजारांचे पारितोषिक दिले जाईल, असे भाजप तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांनी सांगितले. विशेष म्हणजे गोविंदा पथकांना विनामूल्य प्रवेश दिला जाणार असल्याची घोषणा भाजप नेते प्रकाश देसाई यांनी केली.

गोविंदा पथकांनी नाव नोंदणी अधिक माहितीसाठी सुशील शिंदे (९२०९२२२०६५), वैभव जोशी (९८५०६०७०६६), शिरीष सकपाळ (९२२४०८०३५९), रोहन दगडे (९०२८५१०३८९), सुजित बारस्कर (९४२२२६९१८४८), श्रीकांत ठोंबरे (८०८७४३८७९), अक्षय खोडागळे (७३८७२८२११४) यांच्याशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले.

# बीडब्ल्यूएनसी बैठकीत बंदर कर्मचाऱ्यांच्या पगार, बोनसबाबत सकारात्मक चर्चा

**गांधीधाम : वृत्तसंस्था**



गोव्यात झालेल्या बीडब्ल्यूएनसी उपसमितीच्या बैठकीत, गोवा बंदर उपाध्यक्ष आणि उपसमितीचे अध्यक्ष विनायक राव यांनी फेडरेशन आणि इंडियन पोर्ट असोसिएशनच्या सदस्यांचे स्वागत केले आणि पगार, संरक्षित पगार इत्यादींशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा केली.

बैठकीतील फेडरेशनच्या प्रतिनिधींनी पुनरुच्चार केला की राष्ट्रीय समन्वय समितीने सादर केलेल्या अजेंड्यात २७ जुलै २४ च्या तोडग्यातील विविध कलमांची चर्चा समाविष्ट असावी. त्यांनी यावर भर दिला की जिथे विशिष्ट वचनबद्धता देण्यात आली आहे त्या बाबींचे निराकरण करण्यासाठी उप-समित्या स्थापन करण्यात आल्या.

तथापि, आयपीए प्रतिनिधींनी स्पष्ट केले की त्यांना स्थिरता वाढीचा कालावधी दोन टप्प्यांपेक्षा जास्त वाढविण्यात मर्यादा आल्या. तिसऱ्या टप्प्यातही, वर्ग-३ च्या १० व्या स्केलमधील वेतन १,४०,३०० रुपयांपेक्षा जास्त असेल, जे वर्ग-२ च्या वेतन बँडच्या वरच्या मर्यादेपेक्षा जास्त आहे. त्यामुळे, दोन टप्प्यांपेक्षा जास्त मुदतवाढ देणे शक्य होणार नाही. फेडरेशनने या भूमिकेशी सहमती दर्शवली नाही वर्ग-३ मधून बढती मिळालेल्या कर्मचाऱ्यांसाठी वेतन निश्चितीचा पर्याय, वैयक्तिक वेतन, संरक्षित वेतन, पीएलआर सेटलमेंट या मुद्द्यांवरही चर्चा झाली. याशिवाय, निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन सुरक्षा बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या निदर्शनास आणून द्यावी.

या वेळी सुरेश पाटील, अबूबकर, एस. सर्वानन, जी.एम. कृष्णमूर्ती, एल. सत्यनारायण, सुधाकर आर. अपराज, टी. नरेंद्र राव इत्यादी बैठकीला उपस्थित होते.

# ५८व्या युवा महोत्सवात लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे यश



**मोखाडा : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थी विकास विभाग, मुंबई विद्यापीठ आणि जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय गोवेली जि. ठाणे आयोजित ठाणे पालघर ग्रामीण झोन क्र. ६, मधील ५८ वा युवक महोत्सव मोठ्या उत्सहात साजरा झाला. यामध्ये एकूण १५ महाविद्यालयाने सहभाग नोंदवाला होता.

रयत शिक्षण संस्थेचे, लोकनेते रामशेठ ठाकूर कला,विज्ञान महाविद्यालय मोखाडा येथील एकूण १५ स्पर्धामध्ये एकूण २५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेवून तारपा, क्ले मॉडेलिंग आणि पोस्टर मेकिंग या स्पर्धेत पहिला क्रमांक प्राप्त केला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विशेष अनुदान या महाविद्यालयास दिले होते. त्यांच्यामुळेच महाविद्यालयाला यश प्राप्त करता आले. ग्रामीण भाग त्यातही आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा विकास आणि सांस्कृतिक कलागुणांना वाव मिळावा हा त्या पाठीमागे मोठा उद्देश होता.

आपल्या भागातील मुलं इतरांपेक्षा कमी नाही, मुलांच्या कलागुणांना नवीन शैक्षणिक धोरणामध्ये महत्त्व आहे हे महत्व आपल्याला संस्कृती टिकवण्यासाठी त्या आवश्यक आहे. त्यामुळे नियोजनबद्ध आणि क्रियाशील उपक्रम राबवा आणि महाविद्यालयाची प्रगती साधा या मंत्रामुळेच हे सर्व शक्य झाले आहे. त्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन अँड. भगीरथ शिंदे व महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भरभरून कौतुक केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एन.चांदोरे व प्राचार्य डॉ. एस.जी.मेंगाळ यांनी देखील यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

सदस्पर्धांसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.व्ही. एम. मोरे, प्रा. आर. डी. घाटाळ, प्रा. डी. आर. भोये, प्रा. बी. पी. कनोजा व विभागातील सर्व सदस्यांनी अतिशय मेहनत घेतली.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना शुभेच्छा देताना भाजपा रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, रोठ खुर्द बुथ अध्यक्ष सचिन मोरे, सौरभ जोगडे, निखिल बोरेले, पत्रकार जितेंद्र जाधव आदी.**

# खोपोलीत कारखान्यात अपघात; कामगाराचा मृत्यू, नातेवाईक आक्रमक

**खोपोली: प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील वासरं येथील एका स्टील कारखान्यात अपघात होऊन नरेंद्र देशमुख ३५.हा कामगार गंभीर जखमी झाला. त्यास खोपोली येथील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले असता, डॉक्टरांनी मृत झाल्याचे घोषित केले.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नरेंद्र देशमुख राहणार चिंचवली खोपोली हा कामगार काम करीत असताना अपघात झाला खोपोलीतील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र डॉक्टर दळवी यांनी देशमुख हा जागीच मृत झाल्याचे घोषित केले. कंपनी व्यवस्थापनाने सदर घटनेबाबत पोलिसांना कुठलीही प्रथमदर्शनी माहिती दिली नसल्याचे समजते. त्यावरून व्यवस्थापनाची भूमिका ही संशयास्पद असल्याची चर्चा रंगली.

## निवडक

### विजय गायकवाड अध्यक्षपदी

**पनवेल :** आरपीआय (आठवले) पनवेल विधानसभा अध्यक्षपदी विजय गायकवाड यांची निवड करण्यात आल्याचे पत्र कोकण प्रांत अध्यक्ष प्रकाश मोरे यांनी मुंबइ येथील पक्ष कार्यालयात दिले. गायकवाड हे अनेक वर्षे आंबेडकरी चळवळीमध्ये सक्रिय आहेत. या निवडीबद्दल प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, ॲड. मोहन गायकवाड ,रायगड जिल्हा प्रवक्ते मोहनिष गायकवाड, जिल्हा संपर्क प्रमुख राहुल सोनावणे, प्रभू जाधव, सुनील सप्रे, हिरामण गायकवाड, जयप्रकाश पवार यांनी अभिनंदन केले.

### आदई येथे शैक्षणिक साहित्य, छत्रीवाटप



**पनवेल :** गावाच नाव उज्वल करण्यसाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी आदई येथे वह्या वाटप कार्यक्रमावेळी केले. तेथील राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना भाजप नेते जगदीश शेळके यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य आणि छत्री वाटप कार्यक्रम बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, राम पाटील, यतीन पाटील, जगदीश शेळके, भाई पाटील, महादु शेळके, पद्माकर शेळके, श्रीचन भंडारी, आकाश मोकल, राजेश काकडे, जनार्दन पाटील, कैलास पाटील रोहीत पाटील, मंगेश भोपी, एकनाथ शेळके, सुरज पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### मूकबधिरांच्या हस्ते श्रींचे पाट पूजन



**पनवेल :** शंभो मित्र मंडळ, कामोठे यांच्या वतीने आयोजित सार्वजनिक गणेशोत्सवाची यंदाची सुरुवात सामाजिक बांधिलकी जपत मूकबधिर विद्यार्थ्यांच्या हस्ते श्री गणरायाच्या पवित्र पाटपूजनाने करण्यात आली.हिंदुत्वाची शान आणि संस्कृतीचा अभिमान या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. पूजनानंतर मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना ब्लूटूथ स्पीकर आणि घरघंटी अशा उपयोगी भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. यावेळी माजी नगरसेवक विकास घरत, अक्षय देवकर व खिमजीभाई देवडा उपस्थित होते.

# ‘आमदार प्रशांत ठाकूर यांचे नेतृत्व सर्वांचा अभिमान’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर हे कोकणाचे नेतृत्व करणारे नेते असून त्यांच्यासारखे नेतृत्व आपल्याला सर्वांना लाभले आहे याचा सर्वांना अभिमान आहे, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी वस्त्रवारसा हातमाग साडी प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी केले.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पनवेल शहर मंडळाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आणि हातमाग दिवसाचे औचित्य साधून महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पैठणी महोत्सव, फॅशन शो, आणि हातमागाच्या साड्यांचे प्रदर्शन कार्यक्रम बुधवारी झाले.



दरम्यान या कार्यक्रमांतर्गत वस्त्रहरण हातमाग साडी प्रदर्शनाचे उदघाटन वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. हा कार्यक्रम अनेक संस्थांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे, ज्यात साईनगर चॅनेल उपवन, अभिनव महिला मंडळ, नाच ग घुमा, गार्गीज ग्रुप, जागृती महिला मंडळ, रमाई महिला मंडळ, पनवेल स्मार्ट मॉमीज, स्वयंसहाय्यता महिला मंडळ, जीएस फाउंडेशन, जय भवानी महिला मंडळ, एकविरा महिला मंडळ, लहूजी महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, आणि श्री समर्थ महिला मंडळ यांचा समावेश आहे.

या प्रदर्शनाच्या उद्घटनावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव, सरचिटणीस अमित ओझे, महिला मोर्चा पनवेल शहर मंडळ अध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगसेविका अनुराधा ठोकळ, प्रीती जॉर्ज, डॉक्टर सुरेखा मोहकर, सारिका भगत, सुलोचना कल्याणकर, नीता माळी, सुहासिनी शिवणेकर, वर्षा नाईक, प्रीतम म्हात्रे, रुपेश नागवेकर, प्रशांत शेटे, प्रवीण मोरबाळे, संजीवनी खिलारे, स्नेहल खरे, नीता मंजुळे, मनीषा बहिरा, शिवानी घरत, सपना पाटील, कविता ठाकूर यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## वक्तृत्व स्पर्धेतून विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाची देणगी!

### सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे शाळा अंतर्गत फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा या उपक्रमअंतर्गत उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर शाळा येथे शाळा अंतर्गत फेरी अत्यंत उत्साहात पार पडली. यावेळी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने भाषण सादर करत आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.

स्पर्धेतील विषयांमध्ये माझं स्वप्न, शिकल्यामुळे काय फरक पडतो, जर मी जादूगार असतो, शिक्षणाचं महत्त्व, इंटरनेट – वरदान की शाप?, प्लास्टिक मुक्त भारत, मोबाईल नसते तर? अशा रंजक आणि विचार करायला लावणाऱ्या संकल्पनांचा समावेश होता. या फेरीतून प्रत्येक इयत्तेमधून ३ विद्यार्थी



निवडून ते पुढील आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक भावना निर्माण झाली असून, भाषिक कौशल्यासह त्यांचा आत्मविश्वासही वाढीस लागला आहे.

कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रेरणेतून राबवले जाणारे हे वक्तृत्व स्पर्धा उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धेची सकारात्मक भावना निर्माण होते. ही स्पर्धा संवाद कौशल्य, आत्मविश्वास आणि व्यासपीठावरील सादरीकरण यामध्ये भर घालते, असे या वेळी मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी सांगितले.

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पती, सासू, दीर, नणंदेविरुद्ध गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

खारघर, सेक्टर-१३ भागात राहणाऱ्या २५ वर्षीय विवाहितेने पती आणि सासरकडील मंडळींच्या जाचाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे वर्षभरापूर्वीच या विवाहितेचा विवाह झाला होता. खारघर पोलिसांनी या प्रकरणी मृत विवाहितेचा पती निरर्ज जैस्वाल, सासू संगिता जैस्वाल, दिर पंकज जैस्वाल आणि नणंद ममता जयस्वाल या सर्वांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.




या घटनेतील मृत विवाहितेचे नाव करिष्मा निरज जैस्वाल (२५) असे असून तिचे लग्न २६ जुलै २०२४ रोजी निरज पवनकुमार जैस्वाल (३०) याच्यासोबत झाले होते. करिष्माच्या आई-वडिलांनी लग्नात ७ तोळे सोने आणि १ लाख रुपये रोख स्वरुपात दिले होते. मात्र, लग्नानंतर करिष्माला तिच्या सासरकडील मंडळीकडून वारंवार हुंडा, अधिक सोने आणि भांड्यांच्या मागणींसाठी त्रास देण्यात येत होता. तसेच तुझ्या आई-वडिलांनी जे कबूल केले होते, ते अजून दिले नाही, असे वारंवार बोलून तिला मानसिक त्रास देत होती. तसेच करिष्माला पतीसोबत रहायचे असल्यास माहेरकडून पैसे आणण्याची अट घातली जात होती.

दरम्यान, पती आणि सासरकडील मंडळींच्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळलेल्या करिष्माने २९ जुलै रोजी घरामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेनंतर मृत करिष्माची आईने करिष्माच्या आत्महत्येस सासरचेजबाबदार असल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दाखल केली.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त फळे, चादर वाटप



**पनवले : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जीवन ज्योत सेवाभावी सामाजिक संस्था यांच्या वतीने संस्थेच्या अध्यक्ष व संस्थापिका श्रीदेवी भूषणे व सचिव राजू शंकर चौधरी तसेच आपला माणूस युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष अमोल घायाळ यांच्या संयुक्त विद्यमाने जीवन ज्योत वृद्धाश्रम नवीन पनवेल येथे फळ आणि चादर वाटप करण्यात आले.

या वेळी योगेश लहाने, सुनील घरत यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा आणि वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना आपुलकीचा आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## तक्का येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त छत्री वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वामुळे भारतीय जनता पार्टी मजबूत झाली आहे. असे प्रतिपादन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी तक्का येथील मराठी शाळेत आयोजीत केलेल्या छत्री वाटपच्या कार्यक्रमा वेळी केले.

पनवेल मतदार संघाचे कार्यक्रमाट आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस मंगळवारी विविध सामजिकउपक्रमांद्वारे साजरा झाला. वाढदिवसानिमीत्त भारतीय जनता पार्टी आणि एकविरा युवक मित्र मंडळाच्यावतीनेसफाई




कर्मचारी, स्वच्छता दूत आणि ज्येष्ठन नागरीकांना छत्री आणि भेटवस्तू वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी केले होते.

या कार्यक्रमाचा शुभारंभ माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाला असून त्यांच्याहस्ते छत्री आणिभेटवस्तू देण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, सुनील बहिरा, तेजस कांडपीळे, प्रभाकर बहिरा, पनवेलमंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, अमरीश मोकल, संदीप बहिरा, युवानेते प्रतिक बहिरा, तुकाराम बहिरा,राम सरग, जितू खुटकर, आफताब ताडे, महेश रावूल, नितेश बहिरा, संतोष अपशिंगे, उमेश मोरे, ब्रिजेश बहिरा, भरत बहिरा, अतुल बहिरा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवण्याच्या त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत रणछोडजी देवस्थान ट्रस्टने मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये २१ हजार रुपयांची देणगी दिली आहे. ट्रस्टच्या सदस्यांनी देणगीचा धनादेश मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ट्रस्टच्या या सामाजिक कार्याचे कौतुक केले. या प्रसंगी सुनील खळदे, मंदार देवरुखकर, कल्पेश खैरे, मेहुल शहा, ओमकार खळदे, सुभाष पवार, प्रशांत भट, तुकाराम किरवे आणि यतीन देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

## रेल्वेस्थानकात गोव्याच्या दारूसह तिघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रात दारु महाग झाल्याने अनेक जण गोव्यातून स्वस्त दारु आणण्याचा मार्ग अवलंबू लागले आहेत. मात्र, रेल्वे पोलिसांनी अशा प्रवाशांवर वॉच ठेवून रेल्वेमार्गे दारु आणणाऱ्यांची धरपकड सुरु केली आहे. पनवेल रेल्वे स्थानकात पहाटे रेल्वे पोलिसांनी मत्स्यगंधा एक्सप्रेस मधून दारुच्या बाटल्या घेऊन आलेल्या ३ प्रवाशांची धरपडक केली आहे. तसेच त्यांच्याकडून सुमारे ३२ हजार रुपये किंमतीची बेकायदेशीर दारु जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यातील अंमलदार यांना पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास पनवेल रेल्वे स्टेशनवर फलाट क्रं. ५ वर आलेल्या मत्स्यगंधा एक्सप्रेस मधून उतरलेल्या महेंद्र हरसुख बाई राधडिया (३७), चंदन संतोष राजभर (२६) आणि मोहम्मद सर्फराज मोहम्मद शफी शेख (३८) या ३ प्रवाशांवर पोलीसांना संशय आला. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्या बॅगेची तपासणी केली असता सुमारे ३२ हजार रुपये किंमतीच्या दारुचया बाटल्या आढळल्या.

## पनवेलमध्ये शास्त्रीय आणि सुगम संगीताची मैफल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलमध्ये शास्त्रीयआणि सुगम संगीताची एक सुरेल मैफल आयोजित करण्यात आली होती. श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, नादब्रम्ह साधना मंडळ खारघरआणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचे आयोजनकेले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर व भाजप जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी उपस्थित राहून संगीताचा आनंद घेतला.



कार्यक्रमाची सुरुवात मारुती पाटील यांच्या सतारवादनाने झाली. त्यांना तबल्यावरपंडित विनायक नाईक यांनी साथ दिली. त्यानंतर, नवदुर्गा महिला प्रासादिक भजनमंडळ, कोपरा यांनी भजनांचा कार्यक्रम सादर केला. यामध्ये शिवमाला पाटील यांचेसुमधुर गायन झाले, तर निलेश पाटील यांनी पखवाज, मिलिंद कडू यांनी तबलाआणि इतर महिलांनी त्यांना साथ दिली.

या कार्यक्रमाला वसंतशेठ पाटील, सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष पंडित उमेश चौधरी, पंडित महेश कान्होले, पंडित किशोर पांडे, नारायणबुवा पाटील, दिलीप पाटील, विनोद तोडेकर, चंद्रकांत मने, पवन राजे, सुरेश ठाकूर, मच्छींद्र पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या मैफिलीमुळे पनवेलमधील संगीतप्रेमींना एक अविस्मरणीय अनुभव मिळाला.

## सहदुय्यम निबंधक कार्यालयातर्फे रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महसूल सप्ताह २०२५ च्या निमित्ताने पनवेलमध्ये सह दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक १,२,३,४ आणि ५ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचेआयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांनी मोठा प्रतिसाद देत सामाजिकबांधिलकीचे दर्शन घडवले.

शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मान्यवरांच्या



उपस्थितीत रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करुन सामाजिक जबाबदारी पार पाडली.हा उपक्रम मुद्रांक जिल्हा वर्ग १ अधिकारी रायगड अलिबाग श्रीकांत सोनवणे आणि सह. दुय्यम निबंधक वर्ग २ चे नामदेव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

## लोटस असोसिएशनतर्फे रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील लोटस सोशल वेल्फेअर असोसिएशनने रुग्णांच्यासेवेसाठी एक नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी या रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या रुग्णवाहिकेचे अनावरण



करण्यात आले.यावेळी त्यांनी असोसिएशनच्या या सामाजिक कार्याबद्दल कौतुक केले तसेच रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असल्याचेसांगितले. या कार्यक्रमाला कीर्ती नवघरे, नरेश ठाकूर, अमर उपाध्याय यांच्यासहअनेक मान्यवर उपस्थित होते. लोटस सोशल वेल्फेअर असोसिएशनच्या यापुढाकारामुळे परिसरातील गरजू रुग्णांना मोठा फायदा होणार आहे.

## संपादकीय

# सर्वोच्च कानउघाडणी

भारत-चीन सीमा वादासंदर्भात काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी केलेल्या कथित विधानांवरून सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांची चांगलीच कानउघाडणी केली. इतक्या गंभीर विषयावर पुरावा असल्याशिवाय बोलता कामा नये, ही न्यायाधीशांची टिप्पणी योग्यच आहे.

**काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांच्या 'भारत जोडो' यात्रेदरम्यान १६ डिसेंबर २०२२ रोजी चीनने भारताचा भूभाग बळकावल्याबाबतची कथित टिप्पणी केली होती असा आरोप आहे. उथळ विधाने करण्याची राहुल गांधी यांची ही काही पहिली वेळ नव्हे. परंतु यावेळी न्यायालयाने त्यांना चांगलेच फटकारले आहे. तुम्हाला कसे कळले की दोन हजार चौरस किलोमीटर भारतीय भूभाग चीनने बळकावला आहे? तुम्ही तिथे होता का? तुमच्याकडे काही विश्वासार्ह माहिती आहे का? तुम्ही कोणत्याही पुराव्याशिवाय ही विधाने का करत आहात? तुम्ही खरे भारतीय असाल तर तुम्ही असे बोलणार नाही, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने राहुल यांना सुनावले. मात्र त्याचवेळी राहुल गांधी यांच्या विरुद्ध लखनऊ न्यायालयात सुरू असलेल्या मानहानी खटल्यातील कार्यवाहीला न्यायालयाने स्थगिती दिली व त्यांना दिलासा दिला. २०२०च्या गलवान संघर्षादरम्यान चिनी सैनिक भारतीय लष्कराच्या जवानांना मारहाण करत आहेत, असे विधान राहुल गांधी यांनी कथितरित्या केले होते. बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनचे माजी संचालक उदय शंकर श्रीवास्तव यांनी यासंदर्भात मानहानीची तक्रार दाखल केली आहे. याबाबत लखनऊच्या न्यायालयात सुरू झालेल्या कार्यवाहीला स्थगिती देण्यास अलाहाबाद उच्च न्यायालयाने मे महिन्यात नकार दिला होता. त्याला आव्हान देणाऱ्या गांधी यांच्या अपिलावर सर्वोच्च न्यायालयात आता सुनावणी सुरू आहे. यावेळी या प्रकरणाची सुनावणी करणारे न्या. दीपांकर दत्ता व न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने त्यांच्या चीनबाबतच्या विधानांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. तुम्ही लोकसभेचे विरोधी पक्षनेते आहात. असे मुद्दे संसदेत उपस्थित करण्याऐवजी तुम्ही समाजमाध्यमांवर विधाने का करत आहात? संघर्ष असताना दोन्ही बाजूंनी जीवितहानी होणे असमान्य आहे का, अशी विचारणा खंडपीठाने राहुल गांधी यांना केली. त्यावर हा मुद्दा उपस्थित करण्यात त्रुटी होती असे गांधी यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी न्यायालयासमोर कबूल केले. त्यानंतर लखनऊ न्यायालयातील कार्यवाहीला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. तसेच उत्तर प्रदेश सरकार आणि या प्रकरणातील तक्रारदाराला नोटीस बजावून प्रकरणाची सुनावणी तीन आठवड्यांनी ठेवली. गांधी यांनी कुठल्यातरी ऐकीव माहितीच्या आधारावर इतक्या गंभीर विषयावर भाष्य केले होते का, हे सुनावणीत स्पष्ट होईल. विरोधी पक्षनेते पदासारख्या अत्यंत जबाबदारीच्या पदावरील व्यक्तीने देशहित जपण्याचे भान बाळगून बोलावे ही न्यायालयाची अपेक्षा स्वाभाविकच म्हटली पाहिजे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने त्यांची कडक शब्दांत कानउघाडणी केली आहे. विरोधी पक्षनेता म्हणून सरकारच्या व सत्ताधारी पक्षाच्या ध्येयधोरणांवर टीका करणे हा त्यांच्या कामाचा भाग आहे. त्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेने त्यांना दिले आहे. परंतु राज्यघटनेत नमूद केलेल्या मर्यादांचे भानही हवेच. देशाच्या सार्वभौमत्वाविषयी तसेच संरक्षणविषयक कोणतेही विधान करताना सगळ्यांनीच काळजी घ्यायला हवी. जबाबदारीच्या पदांवरील व्यक्तींकडे तर त्याविषयीचे भान असायलाच हवे. पण राहुल गांधी यांना हे कोण आणि कसे समजावणार?**

# पोलादपुरातील श्री शंकराची पुरातन आणि ऐतिहासिक मंदिरे





## खबरबात
शैलेश पालकर

नमो काशिदेवाय।नमो दंडकवासिन्यै। नमोनंत प्रबोधाय। भैरवाय नमोनमः।' असे काशीक्षेत्री आणि दंडकारण्यात प्रामुख्याने ज्याप्रमाणे शंकर महादेव आणि पार्वती म्हणजेच आदिशक्तीच्या विविध रूपांचे पूजन केले जाते; त्याचप्रमाणे महादेवांपासून उत्पन्न अयोनिज श्री काळभैरवनाथांचेही पूजन केले जाते. पोलादपूर तालुक्यातील विविध प्राचीन पुरातन शंकर मंदिरांमध्येही श्रावण महिन्यातील सोमवारव्रत, त्रिपुरारी पौर्णिमा तसेच महाशिवरात्री हे उत्सवांचे दिवस आहेत. शंकर पार्वती यांचे वास्तव्य श्री क्षेत्र महाबळेश्वर असल्याने लगतच्या पोलादपूर तालुक्यात शंकर पार्वतीच्या विविध रूपांची मंदिरे पूजनीय आणि भाविकांचे श्रध्दास्थान आहेत.

पोलादपूर शहराजवळील चरई गावातलगतचा महादेवाचा डोंगर हेच अखंड शिवमंदिर असून या मंदिराचा नदी उत्तरवाहिनी सावित्री नदीजवळील श्रीगंगामाता घाटाजवळ होता. २००५च्या महापूरामध्ये हा नंदी वाहून गेला आहे. डोंगरावर एक जुने जीर्ण पुरातन शिवमंदिर असून त्या मंदिराच्या समोरच्याच डोंगरावर पोलादपूरचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथाचे मंदिर आहे. ज्या गावात श्रीशंकर महादेवाचे मंदिर व श्री काळभैरवनाथांचे मंदिर आहे; त्या गावांना पुरातन महत्व प्राप्त आहे. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील मंदिरामध्ये ज्याप्रमाणे श्री काळभैरवनाथांचे अग्रक्रमाने दर्शन घेतल्यानंतर श्री शंकर महाबळेश्वराचे दर्शन भाविक घेतात; त्याचप्रमाणे पोलादपूर येथील श्री काळभैरवनाथांना अग्रक्रम प्राप्त असून ग्रामदैवत असा दर्जा प्राप्त आहे. अशाच प्रकारे तालुक्यातील सवाद येथील श्री महादेव महाबळेश्वर मंदिरामध्ये श्री काळभैरवनाथांचे अग्रक्रमाने दर्शन घेतले जाते.

पोलादपूर शहरातील सिध्देश्वर आळीमध्ये असलेल्या श्री सिध्देश्वर शंकर मंदिराचा जीर्णोध्दार कार्तिक शके १८२०मध्ये झाल्यानंतर तब्बल सव्वाशे वर्षांनंतर सिध्देश्वर मंदिराचा पुन्हा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. ग्रामस्थांनी यासाठी सहकार्य केले आहे. श्रावणी सोमवार, प्रदोष, त्रिपुरारी पौर्णिमा आणि महाशिवरात्रीनिमित्त उत्सव केले जातात.

गोवेले साळवी कोंड आणि चांदके या गावांच्या हद्दीमध्ये असलेल्या दूर्गम महादेवाचा मुरा येथील पठारावर म्हशी, गायी-गुरे चरायला नेणाऱ्या गुराख्यांना एक गाय एका ठिकाणी स्वतःहून दूधाची धार सोडत असल्याचे दिसून आले. याठिकाणी ग्रामस्थांना सोबत घेऊन गुराख्यांनी खणले असता तेथे शंभूमहादेवाची पिंडी दिसून आल्याची दंतकथा येथे वृध्दांकडून सांगितली जाते. तालुक्यातील महादेवाचा मुरा या सर्वात उंचावरील तीर्थक्षेत्री ग्रामस्थ मंडळ आणि ओंकार मित्र मंडळ महादेवाचा मुरा यांच्यामार्फत महाशिवरात्री उत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते.

डब्ल्यू.एस.सिन्क्लेयर यांनी बॉम्बे गॅझेटीयरमध्ये या वल्लभेश्वर शिवमंदिराबाबत महाडच्या पूर्वेला ५ मैलावर महाड-पोलादपूर रस्त्याच्या पूर्वेला १ मैलावर सावित्री नदीच्या पात्रालगत असलेल्या माटवण या गावात पुरातन पध्दतीचे महादेवाचे मंदिर आहे. ८-१० चौरस आधारस्तंभ असून ते पाच फुटापेक्षा अधिक उंच नाहीत. सर्वच स्तंभांवर पुरातन कथांवर आधारित कोरीव काम आहे. मंदिरातील शंकराच्या पिंडीतील शिवलिंग शुभ्र पाषाणाचे असून बॉम्बे गॅझेटीयरमध्ये नमूद केलेली शिल्पे सध्या मंदिरालगतच्या दिसून येत आहेत. अलिकडेच या वल्लभेश्वर शिवमंदिराचा जीर्णोध्दार झाला आहे.

श्री क्षेत्र महाबळेश्वर येथून पंचगंगेपासून पाच नद्यांचे प्रवाह निघाल्यानंतर सावित्री नदीला रागापासून वाचविण्याची जबाबदारी घेतलेल्या भगवान महादेवांनी पाठलाग सुरू केला, मात्र सावित्री समुद्राला श्रीक्षेत्र हरीहरेश्वर येथे जाऊन मिळाली. महादेवांच्या सावित्रीच्या पाठलागातील मध्यबिंदू म्हणून सवादच्या या श्री महाबळेश्वर शंकर मंदिराचा उल्लेख केला जातो, असे पुजारी सुरेश जंगम यांनी सांगितले. याशिवाय कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरासुराचा वध केल्यानंतर सर्व शिवभक्तांनी त्रिपुर प्रज्वलीत केल्याच्या पार्श्वभूमीवर या उत्सवाचे शिवभक्तांमध्ये अनन्यसाधारण महत्व असून छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतापगड ते रायगड या घोडदळाच्या मार्गावरील हे सवादचे शंकर मंदिर दर्शनासाठी महत्वाचे स्थान मानले जात असे. या परिसरात सतीचे पाषाण आणि श्री क्षेत्र महाबळेश्वर तसेच श्री क्षेत्र हरिहरेश्वरप्रमाणे प्रथम काशी क्षेत्राचे आद्यवंदनीय दैवत श्री काळभैरवनाथ व देवी जोगेश्वरीचे मंदिरही आहे, असे महादेव तांदळेकर यांनी सांगितले.

तालुक्यातील पहिली यात्रा त्रिपुरारी पौर्णिमेला या मंदिराची असते.

महालगूर गावाच्या या श्री मल्लिकार्जून मंदिराच्या परिसरात दक्षिणेला श्रावण महिन्यात सुमारे २०० फूट कड्यावरून वाहणारा धबधबा आणि पूर्वेच्या पठारावर बेलवृक्षांचे बन मंदिराखालून दक्षिणवाहिनी गंगा व बिंदूतीर्थ नावाचे कधी पाण्याची पातळी न आटणारे तीर्थकुंड असून पश्चिमेला अनादी काळापासूनचा विशाल पारिजातकाचा वृक्ष आहे. या पारिजातकाखाली नवनाथांचे जागृत वास्तव्य आहे. येथे दोन शिवलिंग शेजारी शेजारी असल्याचे दूर्मिळ दृश्य पाहण्यास मिळते. मनोकामना पूर्ण करणाऱ्या श्रीमल्लिकार्जून मंदिरात श्रावण महिना आणि महाशिवरात्रीला शिवलिलामृत ग्रंथपारायण व ज्ञानेश्वरीचा ९व्या व १२व्या अध्यायाचे पारायण केले जाते.

देवळे येथील पुरातन महाबळेश्वर शिवमंदिराचा इतिहास तब्बल बाराव्या शतकातील असल्याचे दंतकथेनुसार पिढीजात सांगितले जात आहे. श्री क्षेत्र महाबळेश्वराच्या अन् सह्याद्री पर्वतरांगांच्या पायथ्याशी असलेल्या या गावामध्ये स्वयंभू महादेवाचे स्थान असून तेदेखील महाबळेश्वर मंदिर म्हणून सर्वश्रुत आहे. पूर्वी धर्मरक्षणासाठी आणि शिवछत्रपतींच्या काळात हिंदवी स्वराज्य रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्यांच्या शिळा वीरगळ या मंदिर परिसरामध्ये आढळून आल्या आहेत. अनेकदा विविध राजवटीमध्ये आणि अस्मानी संकटांमध्ये मातीच्या ढिगाऱ्यासदृश्य नेस्तनाबूत झालेले हे महाबळेश्वर मंदिर नित्यनेमाने महाशिवरात्रीच्या उत्सवासाठी नेहमीच सज्ज होत असे. अलिकडेच चाळीस गावांतील भक्तगणांनी पुन्हा उभारण्यास सुरूवात केली असल्याने परिसराला मंदिराचे रूप येऊ लागले आहे. या मंदिराच्या देखभाल पूजाअर्चेसाठी भातशेतीची जमीन असून पूर्वी लांग्या कोळी हा महाबळेश्वर देवस्थानाच्या पूजेसाठी श्रीक्षेत्र महाबळेश्वरापासून येत असल्याने या जमिनीला नाग्याची पटी असेही आजतागायत ओळखले जात आहे. पोलादपूरचे शिवभारत संस्कृत ग्रंथाचे रचनाकार स्वामी कवींद्र परमानंद हेदेखील दर्शनासाठी आले असता त्यांनी श्रीमहाबळेश्वराच्या स्त्रोत्रातील एक श्लोक या मंदिराच्या भिंतीवर लिहिला होता. त्रिपुरारी पौर्णिमेला या मंदिरपरिसरात त्रिपुरा आणि सर्वत्र दिवे पेटविण्याचीही परंपरा आहे. मंदिराच्या गाभाऱ्याबाहेर तीन नंदी असून मंदिराबाहेर एक आणि गाभाऱ्यात एक अशा दोन शिवलिंगांची पूजा होत असते. गाभाऱ्यांतील शिवलिंगावर अभिषेकाची संततधार असून संपूर्ण शिवलिंगावर पितळी पत्रा बसविलेला आहे. या शिवलिंगावर अभिषेकाची संततधार असून मंदिराबाहेर पितळी नाग तसेच मंदिरातही नागासोबत त्रिशूल डमरू अशी रचना असल्याची माहिती येथील महाबळेश्वराचे नित्यसेवक तुकारामशेठ केसरकर यांनी दिली.

मोरसडे आडाचाकोंड येथील श्री गुप्तेश्वर शिवलिंग मंदिर आडाचाकोंड येथे प्रकट झालेल्या शिवलिंगाचा आकार पाहून इश्वरी अस्तित्वाची खात्री प्रत्येक भक्ताला पटते. तिन्ही बाजूंनी थोडेसे बाहेर टोक आणि चौथी बाजु थोडीशी मोठी आणि मध्येच उंचवटा या पाषाणाला शोभणारे हेच ते शिवलिंग थेट जमिनीतून प्रकट झाल्याने हे शिवलिंग जागृत देवस्थान मानले जात आहे. मोरसडे आडाचा कोंड या गावी १९८६ साली आडाचा कोंड या गावचे रहिवासी आणि पोलादपुर तालुक्याचे माजी सभापती कै. कोंडिराममास्तर उतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्री उत्सव सुरू झाला असून या उत्सवाला यंदा ३३ वर्षे पूर्ण होत आहेत.

लोहारमाळ आणि अन्य ठिकाणीही शिवमंदिरे भव्य स्वरूपात असून पावसाळा उशीरा सुरू झाल्यानंतर या शिवमंदिरांमध्ये गाभारा पाण्याने भरण्याची प्रथा असून यामुळे पाऊस लवकर सुरू होत असल्याची प्रचिती आलेली आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# नवीन ॲपल १७ची लॉन्चपूर्वी जाणून घ्या फिचर्स

ॲपलप्रेमी आयफोनच्या नवीन मॉडेलची आतुरतेने वाट पाहत आहेत. ब्लूमबर्गच्या एका अहवालानुसार



Apple येत्या ८ ते १० सप्टेंबर २०२५दरम्यान त्यांची नवीन iPhone १७ सीरिज लॉन्च करू शकते. यावेळी कंपनी चार मॉडेल iPhone १७, iPhone १७ Pro, iPhone १७ Pro Max आणि नवीन iPhone १७ Air लॉन्च करू शकते. आयफोनचे प्लस मॉडेल ग्राहकांमध्ये लोकप्रिय नसल्याने ते काढून टाकण्यात आले आहे.

### कुठे स्वस्तात मिळणार?

मीडिया रिपोर्टनुसार भारतात आयफोन १७ची सुरुवातीची किंमत सुमारे ७९,९०० रुपये असू शकते, तर अमेरिकेत बेस व्हेरिएंटची किंमत सुमारे ८९९ असू शकते, जी भारतापेक्षा स्वस्त आहे तसेच यूएईमध्ये या फोनची सुरुवातीची किंमत सुमारे AED ३,७९९ असू शकते. या किमती वाढण्याचे कारण अमेरिका-चीन व्यापार तणाव आणि उत्पादन खर्चात वाढ असल्याचे सांगितले जात आहे.

### डिझाइन आणि रंग

Appleने यंदा आपल्या आयफोनच्या डिझाइनमध्ये काही बदल केले आहेत तसेच यात नवीन रंग पर्याय Desert Titanium मिळेल. हे नवीन मॉडेल ऑरेंज टोनसह earthy लुक देईल. Pro आणि Pro Max मॉडेल्स चार रंगांमध्ये उपलब्ध असतील. यात ब्लॅक, व्हाइट, डार्क ब्लू आणि डेझर्ट टायटेनियम सामील आहे. तसेच डिस्प्ले साइझबद्दल सांगायचे झाले, तर iPhone १७ आणि १७ Proमध्ये ६.३-इंच स्क्रीन मिळेल, तर iPhone १७ Airमध्ये ६.६-इंच आणि Pro Maxमध्ये ६.९-इंच डिस्प्ले मिळेल.

### कॅमेरा कसा असेल

iPhone १७ सीरीजमध्ये अपग्रेडेड कॅमेरा मिळू शकतो. रिपोर्ट्सनुसार या नवीन फोनमध्ये २४MP फ्रंट कॅमेरा मिळेल, ज्यात ६-एलिमेंट लेन्स असेल, तर iPhone १७ Pro Maxमध्ये एक नवीन ४८MP टेलीफोटो लेंस आणि सध्याचे १२MP मेन लेन्स असेल. iPhone १७ सीरीजची प्री-ऑर्डर बुकिंग १२ सप्टेंबर २०२५पासून सुरू होऊ शकते. भारतातील आयफोनची मागणी पाहता यंदा भारताला पहिल्या फेझच्या लॉन्चिंग लिस्टमध्ये सामील केले आहे.

# हरित क्रांतीचे जनक डॉ. एम.एस. स्वामीनाथन



## निमित्त


भारतीय अनुवंशशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय प्रशासक आणि कृषी शास्त्रज्ञ डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांचा आज जन्मदिवस. भारतातील हरित क्रांतीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. कृषीप्रधान देशात कृषी क्षेत्रातील संशोधनासाठी त्यांनी एम.एस.स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली.

७ ऑगस्ट १९२५ रोजी तामिळनाडूमधील कुंभकोणम येथे सांबशिवम स्वामीनाथन यांचा जन्म झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. स्वामीनाथन अवघ्या दहा वर्षांचे असताना वडिलांचे निधन झाले. सुरुवातीला वडिलांप्रमाणे स्वामीनाथनसुद्धा डॉक्टरी शिक्षणाकडे वळले, पण त्या वेळी बंगालमध्ये पडलेल्या भीषण दुष्काळामुळे त्यांना दुःख झाले. सुरुवातीपासूनच शेती क्षेत्राची आवड असलेल्या सांबशिवम स्वामीनाथन यांनी डॉक्टरी शिक्षण अर्धवट सोडले. त्यानंतर ते शेतकी विषयाकडे वळले. १९४४मध्ये त्रावणकोर विद्यापीठातून ते बीएससी पदवीधारक झाले. त्यानंतर १९४७मध्ये कोईंबतूर कृषी महाविद्यालयातून त्यांनी कृषी विषयात बीएससीची पदवी मिळवली. १९४९मध्ये स्वामीनाथन यांनी दिल्लीच्या इंडियन ग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटमधून विशेष प्रावीण्यासह पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर स्वामीनाथन हे केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. ते भारतीय पोलीस सेवेसाठीही पात्र ठरले, मात्र त्यांनी पोलीस ऑफिसर न होता कृषी क्षेत्रात संशोधन करण्याचा निर्णय घेतला.

१९५२मध्ये स्वामीनाथन यांनी केंब्रिजच्या ॲग्रीकल्चर स्कूलमधून पीएचडी मिळवली. या वेळी त्यांचा संशोधनाचा विषय बटाटा होता. पदवी मिळवल्यानंतर स्वामीनाथन यांनी शेतीत करिअर करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी मद्रासच्या कृषी महाविद्यालयात (आताच्या तामिळनाडू कृषी विद्यापीठात) प्रवेश घेतला. येथे त्यांनी कृषी विषयातील पदवी संपादित केली. कृषी क्षेत्रातील अभ्यासाकडे वळण्याविषयी स्वामीनाथन यांनी एक आठवण सांगितली आहे. १९४३मध्ये केरळ विद्यापीठाचा विद्यार्थी असताना बंगालमध्ये दुष्काळ पडला होता. त्या वेळी प्रत्येकजण देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान देत होता. बंगालमधील दुष्काळातून प्रेरणा घेत देशातील शेतकऱ्यांसाठी कार्य करण्याचा विचार करत त्यांनी कृषी क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला. अभ्यासात हुशार असलेल्या स्वामीनाथन यांनी अभ्यासासोबतच खूप कष्ट उपसले. १९४९ ते ५० या कालावधीत त्यांनी नेदरलँड्स विद्यापीठात अनुवंशशास्त्र विभागाचे युनेस्कोचे फेलो म्हणून काम केले. त्यानंतर १९५२ ते ५३ या कालावधीत त्यांनी अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापीठाच्या अनुवंशशास्त्र विभागात संशोधन सहकारी म्हणून काम केले, पण स्वामीनाथन यांना त्यांच्या संशोधन कार्यात मदत होईल अशा कामाची गरज होती. अशातच आंतरराष्ट्रीय संस्थेत तांदळावर संशोधन करण्याची संधी त्यांना मिळाली.

दरम्यानच्या काळात स्वामीनाथन व सहकाऱ्यांना त्या वेळी भारतात आलेल्या डॉ. व्होरलॉग यांचे मार्गदर्शन लाभले. पुढे देशातील शेतकऱ्यांची दुरवस्था घालवण्यासाठी १८ नोव्हेंबर २००४मध्ये आयोगाची स्थापना करण्यात आली. डॉ. एम.एस. स्वामीनाथन हे या आयोगाचे अध्यक्ष होते. अशा या महान व्यक्तिमत्वाचे २८ सप्टेंबर २०२३ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# बेलाच्या पानांचे जबरदस्त फायदे

श्रावण महिना आला की बेलाच्या पानांना अतिशय महत्त्व प्राप्त होते. श्रावणी सोमवारची पूजा तर बेलाच्या पानांशिवाय अपूर्णच. जोपर्यंत महादेवाच्या पिंडीला बेल वाहिला जात नाही, तोपर्यंत ती पूजा काही पूर्ण होत नाही असे मानले जाते. ज्या वनस्पतींना आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व असते, त्या वनस्पती आपल्याकडे आध्यात्मिक दृष्टिकोनातूनही अतिशय महत्त्वाच्या मानल्या जातात. तुळस, बेल ही काही त्याचीच उदाहरणे. आता श्रावणाच्या महिन्यात बेलाच्या पानांना एवढे महत्त्व का असते ते पाहूया..



डॉ. श्रेय शर्मा यांनी ओन्ली माय हेल्थ यांना दिलेल्या माहितीनुसार बेलाची पानं मधुमेह, लिव्हर, मुत्राशयाचे आजार तसेच पचनक्रिया सुधारण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरतात. बेलाच्या पानांमध्ये ण्टीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे ते ॲण्टी कॅन्सर एजंट म्हणून ओळखले जातात. सिडीटी, कॉन्स्टीपेशन, गॅसेस, पोटदुखी असे त्रास कमी करण्यासाठीही बेलाची पाने उपयुक्त ठरतात. बेलाच्या पानांमध्ये ॲण्टीबॅक्टेरियल आणि ॲण्टीफंगल गुणधर्म असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीही त्याचा उपयोग होतो, पण डॉक्टरांच्या सल्ल्यानेच त्याचे सेवन करावे. मनानेच कोणतेही प्रयोग करणे टाळावे.

आरोग्यासाठी जसा बेल उपयुक्त ठरतो, तसाच तो सौंदर्याच्या दृष्टीनेही फायदेशीर ठरतो. त्वचा मऊ, हायड्रेटेड ठेवण्यासाठी बेलाची पाने खूप उपयुक्त ठरतात. त्वचा लालसर होऊन खाज येत असेल किंवा त्वचेवर कोणतेही फंगल इन्फेक्शन झाले असेल तर अशावेळी बेलाच्या पानांचा लेप उपयोगी ठरतो.

ॲक्ने, पिगमेंटेशन आणि पिंपल्स कमी करण्यासाठीही बेलाच्या पानांचा रस लावण्याचा सल्ला दिला जातो. बेलाच्या पानांचा ताजा रस काढून त्यामध्ये तुमच्या सोयीनुसार लिंबू, हळद, बेसन, तांदळाचं पीठ असे वेगवेगळे पदार्थ घालून त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा आणि १० ते १२ मिनिटांची चेहरा धुवून टाकावा. आठवड्यातून एकदा हा उपाय केल्यास त्वचेमध्ये खूप छान बदल दिसून येईल.

एकूणच आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाणारे बेल आरोग्याच्या दृष्टीनेही उपयुक्त आहे.

# थेरोंडा-पालवदरम्यानचा साकव कोसळला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थेरोंडा-पालव गावांना जोडणारा प्रमुख साकव बुधवारी अखेर कोसळला असून या दुर्घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे या साकवाची अवस्था धोकादायक असल्याची वारंवार तक्रार प्रशासनाकडे केली होती, मात्र संबंधित विभागाकडून वेळेवर योग्य उपाययोजना न झाल्याने आज ही दुर्घटना घडली आहे.



या साकवाचा वापर शालेय विद्यार्थी, वृद्ध, रुग्ण आणि शेतकरी वर्गासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. याच मार्गावरून दररोज अनेकजण पायी आणि वाहनांनी ये-जा करत होते. पावसामुळे खालचा पाण्याचा प्रवाह वाढल्याने आणि साकवाची स्थिती आधीच कमकुवत झाल्यामुळे अखेर तो आज कोसळला.

गावातील नागरिकांनी तात्काळ नव्या साकवाचे काम सुरू करण्याची मागणी केली असून भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी पावसाळ्यात अशा धोकादायक साकवांची तपासणी करून वेळेत उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त
# नागोठणे येथे आरोग्य शिबिर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील डॉक्टर नेल्सन मंडेला निवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मंगळवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी भाजप नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांच्या पुढाकाराने दंत चिकित्सा व आरोग्य शिबिराचे आयोजन भाजप नागोठणे शहर यांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष भाजपा श्रेया कुंटे, रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी, उपाध्यक्ष गौतम जैन, तिरत पोलसानी, अशोक अहिरे, विवेक रावकर, प्रियंका पिंपळे, पल्लवी माने तर शाळेच्या वतीने मुख्याध्यापक नवनाथ डोंगरगावकर, शिक्षिका वनिता पाटील, शिक्षक सुभेदार कमाल, शिक्षकेतर कर्मचारी सखाराम सांबरे सर्व विद्यार्थी आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी, औषधोपचार आणि आरोग्य शिक्षण दिले गेले. या तपासणीमध्ये विद्यार्थ्यांचे जनरल चेकअप व दंतचिकित्सा करण्यात आली. तसेच त्यांना योग्य औषध देण्यात आले. आरोग्य शिक्षणामध्ये वैद्यकीय स्वच्छता व परिसर स्वच्छता यांचे सुद्धा धडे त्यांना देण्यात आले. यावेळी नागोठणे येथील नामांकित डॉक्टर अभिषेक शहासने, डॉक्टर संकेत म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली.

निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले रहावे, त्यांना आवश्यक आरोग्य सुविधा तसेच आरोग्यविषयक शिक्षण मिळावे यासाठी हे शिबिर आयोजित केल्याची माहिती भाजपचे सचिन मोदी यांनी दिली.



# माथेरानमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अनोखा उपक्रम

**माथेरान : बातमीदार**

पनवेलचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त माथेरान मध्ये एक अनोखा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.माथेरान भाजप महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन येथील शालेयविद्यार्थी आणि दिव्यांग बांधवांसोबत स्नेहभोजन केले.तसेच चिमुकल्यांनी केक कापून आमदारांना गोड शुभेच्छा दिल्या.



माथेरान भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि.५ ऑगस्ट प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माथेरान भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी येथील दोन्ही शाळेतील शालेय विद्यार्थी आणि शहरातील दिव्यांग बांधव यांच्या साठी स्नेहभोजनाचे आयोजन येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषद प्राथमिक शाळेमध्ये केले होते.

यावेळी निसर्गाच्या सानिध्यात शालेय चिमुकल्यांच्या हस्ते केक कापून आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.तदनंतर सर्वांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.यावेळी भाजपा सरचिटणीस राजेश चौधरी यांनी दोन्ही शाळेच्या शिक्षकांना शाळेसंदर्भात काही समस्या असल्यास आम्हाला सांगणे आम्ही तातडीने त्या सोडविण्याचा प्रेयन्त करू असे म्हटले.यावेळी दोन्ही शाळेचे विद्यार्थी,शिक्षक तसेच माथेरान भाजपा शहर अध्यक्ष प्रविण सकपाळ,उपाध्यक्ष सुभाष भोसलेकिरण चौधरी,माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी,चंद्रकांत जाधव,सरचिटणीस राजेश चौधरी,माजी नगरसेवक प्रदिप घावरे,संदीप कदम,व्यावसायिक उद्योजक शैलेश चाफेरकर,विजाराम चौधरी महिला आघाडीच्या प्रतिभा घावरे,सुहासिनी शिंदे,पूनम सकपाळ आदी उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**पाली : रामप्रहर वृत्त**

पाली पोलीस ठाणे हद्दीत सोमवारी मौजे पाली गावचे हददीत शिवम अपार्टमेंट बिल्डींग समोर पाली वाकण रोडवर,कोणत्यातरी अज्ञात वाहनाच्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने व भरधाव वेगात चालवुन रस्त्याने पायी चालणारा अर्जुन बहादुन सर्की वय २२ वर्षे रा. २२/२, थुक्करम २ स्ट्रीट, थियागरया नगर चेन्नई राज्य तामिळनाडू पिनकोड ६०००१७ यास ठोकर मारून त्याचे डोक्याला व उजव्याहाताचे खादयाला लहान मोठया गंभीर स्वरूपाच्या दुखापती होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला तसेच अपघाताची खबर न देता पळुन गेलायाबाबत पाली पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यातआला असून अधिक तपास पोह/पाटील हे करीत आहेत.

# रोहा तहसील कार्यालयात महसूल लोक अदालत

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तहसील कार्यालयात तहसीलदार यांचे न्यायालयात दि.११ ऑगस्ट, १८ ऑगस्ट, २५ ऑगस्ट २०२५ या दिवशी सकाळी ११.३० या वेळेत महसूल लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. रोहा तहसील कार्यालय येथे ही महसूल लोक अदालत घेण्यात येणार आहे. रोहा तालुक्यातील व या न्यायालयातील संबंधित सर्व मान्यवर विधिज्ञ, संबंधित पक्षकारांनी अपिलांचा जलद गतीने निपटारा करण्याचे असल्याने सदर दाखल असलेल्या अपिल प्रकरणांमध्ये या न्यायालयात महसूल लोक अदालती मध्ये त्या दिवशी आयोजित होणाऱ्या सुनावणीचे दिवशी संबंधित विधिज्ञ व त्यांचे पक्षकार यांनी समेटाने मिटणाऱ्या प्रकरणांमध्ये लेखी म्हणणे न चुकता सादर करावे, असे आवाहन रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांनी केले आहे.

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडील अर्धन्यायिक कामाकाजामध्ये अनेक वेळा महसुली दावे दाखल झाल्यानंतर विविध कारणांमुळे प्रलंबित राहतात. याकरिता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दि.२३ जुलै २०२५ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे महसुल अधिकारी यांच्या घेतलेल्या आढावा सभेमध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहे.

# मुरूड पोलीस वसाहत लवकर बनवण्याची मागणी



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पोलीस कर्मचाऱ्यांकरीता पोलीस वसाहत लवकरात लवकर बनवा अशी मागणी मुरुड पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी रायगड अलिबाग पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.यावेळी अरविंद गायकर, सुशील ठाकुर हे निवेदन देते वेळी उपस्थित होते.

मुरुड मध्ये पोलीस कर्मचारी यांच्या करीता नविन वसाहती होणे करीता सन २०१८ पासून २०२५ पर्यंत ८ वर्ष मुरुड पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने प्रयत्न करत आहे.` गेल्या वर्षी जवळपास ती सर्व वसाहत घरे जमीन दोस्त केली आज एक वर्ष जास्त झालं अद्याप काहीही हालचाल केलेली नाही सर्व पोलीस कर्मचारी भाड्याच्या घरात राहतात आमच्या महिला पोलिस कर्मचारी या सुद्धा भाड्याच्या घरात राहतात

परंतु यावर अद्याप निर्णय झाला नाही रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आचल दलाल यांनी आमच्या निवेदनाचा विचार करून लवकरात लवकर प्रयत्न करुन पोलिस कर्मचाऱ्यांना सुसज्ञ नवीन घरे मिळुन द्यावे, अशी विनंती यावेळी करण्यात आली आहे.

# अंजुमन इस्लाम संस्थेच्या अध्यक्षपदी नाजीम चोगले, तर सचिवपदी निसार बिरवाडकर

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा मुरुड संस्थेच्या अध्यक्षपदी नाजीम चोगले तर सचिवपदी निसार बिरवाडकर यांची निवड एकमताने करण्यात आली आहे.

सदर संस्था ही मुंबई विभागासहित रायगड जिल्ह्यातील मुरुड,श्रीवर्धन व म्हसळा या तालुक्यातील ७० पेक्षा अधिक गावातील मुस्लीम समाजाचे लोक या संस्थेशी जोडले गेले आहेत. या संस्थेच्या मुख्य केंद्रिय कमिटीत नाजीम चोगले यांची सर्वानुमते अध्यक्षपदी तर सचिवपदी डॉ .निसार बिरवाडकर, सहसचिवपदी अ.समद मुहीबुल्ला नजीर, अव्वाब हबीब फकीह (मुंबई )यांची खजिनदारपदी बिनविरोध निवड करण्यात आली.


**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५५२० फॅक्स नं. ०२१९४-२३४०८७
Email : rohanagarpalika@gmail.com

**जाहीर निविदा सूचना**

रोहा अष्टमी नगर परिषद आरोग्य विभागाद्वारे ''स्वच्छ भारत अभियान'' व ''माझी वसुंधरा अभियान'' अंतर्गत रोहा अष्टमी शहरात जनजागृती (IEC) व इतर उपक्रम राबविणे कामी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून विहित नमुन्यात दरपत्रक/ कोटेशन मागविण्यात येत आहे. विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ०७/०८/२०२५ पासून १३/०८/२०२५ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये खाली नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील. अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या आरोग्य विभागात संपर्क साधावा.

| क्र. | कामाचा तपशिल | इसारा रक्कम (रूपये) | कोरी निविदा फॉर्म फी (रूपये) | काम करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | ''स्वच्छ भारत अभियान'' व ''माझी वसुंधरा अभियान'' अंतर्गत रोहा अष्टमी शहरात जनजागृती (IEC) व इतर उपक्रम राबविणे. | ५००० | ५०० | कामाचे आदेशानुसार |

क्र. रोनप/आरोग्य/नि.सूचना/७४९/२०२५-२०२६
दिनांक- ०६/०८/२०२५

सही/-
**(अजयकुमार एडके)**
मुख्याधिकारी
रोहा अष्टमी नगर परिषद



**Loss of Documents**

This is to inform that, I am a Owner of the Ratndeep Steel Traders, Office No-150 & 151, Dishma Office, Plot No. 246, Steel Market Kalamboli, Navi Mumbai- 4102018 and the Original Documents like Allotment Letter, Possession Letter & Agreement copy of the said property are now misplaced. FIR Logged at Panvel police station, Registration no.1460/2025 dt. 04/08/2025. Any body having any objections to issues of duplicate copy of these Papers in lieu of the above, may please write to the below address.

**Shri. Popatlal Prabhuram Thakkar**
**PL/5A/21/02, Sector-17, New Panvel, 410206. Mob.: 9821330062**



JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
**SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI**
**Plot no.60/61, Sector- 12, Tal: uran. Dist: Raigad. -400 707.**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026. (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant – Teacher for the Academic Year – 2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| SR. NO | SECTION | TITLE OF POST | SUBJECTS/ SECTIONS | QUALI-FICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|---|
| 01 | PRIMARY & SECONDARY | ASST-TEACHER | Physical Educator | B.A. B.P.Ed. | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no. 8, Sector-14. New Panvel, Dist: Raigad. 410 206.**
Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** on or before **Saturday 16th August 2025**
If required Contact No. **1. MRS. SAYLEE PATANKAR - 9930718675**
**2. MRS. PATIL SNEHAL - 9594964872**

**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**


# उषःकाल फाऊंडेशनचा समाजाभिमुख उपक्रम

**माणगांव: बातमीदार**

गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा आणि आत्मविश्वास वाढवणारा उपक्रम उषःकाल फाऊंडेशनतर्फे राबविण्यात आला. कै. उषा नामदेव शिंदे यांच्या चतुर्थ स्मृतिदिनी व कै. आदिप शिंदे यांच्या स्मरणार्थ आयोजित या उपक्रमात, विघवली विभाग हायस्कूल येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेशाचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत २० विद्यार्थ्यांना शाळेचे गणवेश, ५० विद्यार्थ्यांना वही व पेन, तर काही विद्यार्थ्यांना चित्रकलेसाठी लागणारे साहित्य देण्यात आले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या या मदतीमुळे त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य झळकले आणि त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली.

मुख्याध्यापक पांडुरंग उभारे यांनी शाळेच्या वतीने उषःकाल फाऊंडेशनचे आभार मानले व अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. या प्रसंगी विघवली विभाग हायस्कूलचे अध्यक्ष महादेव बक्कम,फाऊंडेशनचे विश्वस्त प्रविण जाधव, कृष्णा शिंदे, राम वाढवळ, जयेश सकपाळ, विठोबा उभारे, प्रतिक मोरे पालक, शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.





**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. प्रिया मोहन गुरनानी १८०३, द अफेअर्स, पाम बीच रोड, प्लॉट नं. ०९, सेक्टर १७, सानपाडा नवी मुंबई | ०४ जगली, ०३ भेंड व ०२ अंबा अशी एकूण ०९ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील गट क्रमांक व उपविभाग३६/१ व ३६/२ गाव-बीड, ता. पनवेल, जि.रायगड या भूखंडाच्या आवारातील ०९ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(स्वरुप खारगे)**
उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३८३/३९०/२०२५
दिनांक : ६/०८/२०२५



JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
**MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA, GAVHAN KOPAR**
**Plot No: 1, Ulwe Node, At Post : Gavhan Kopar. 410 206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026 (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant – Teacher for the Academic Year – 2025-2026. On Purely Temporary for one year basis for the following subjects**

| SR. NO | SECTION | TITLE OF POSTS | SUBJECTS / SECTIONS | QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|---|
| 01 | PRE-PRIMARY | ASST-TEACHER | B.A. ECC Ed | B.A. E.C.C. Ed | 01 |
| 02 | PRIMARY | ASST. TEACHER | ENGLISH & S.S.T. | B.A. B.Ed. | 01 |
| 03 | PRIMARY | LIABRARIAN | LIABRARIAN | B.A. B.LIB M.LIB | 01 |
| 04 | SECONDARY | ASST TEACHER | MATHEMATICS | M.Sc. B.Ed | 01 |

Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no. 8, Sector-14. New Panvel, Dist: Raigad. 410 206.**
Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** on or before **Saturday 16th August 2025**

**If required Contact :**
**1. MRS. SAYLEE PATANKAR – 9930718675**
**2. MRS. CHAITALI KADU – 9773323876**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

# सार्वजनिक गणेशोत्सव नियोजन बैठक

## ◆ पनवेल महापालिकेच्या वतीने विविध विषयांवर चर्चा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक गणेशोत्सव व्यवस्थितरीत्या उत्साहात संपन्न होण्याकरिता नियोजन करण्याच्या हेतूने मा. आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात दिनांक ०५ ऑगस्ट रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने गणेशोत्सवासाठी गणेश मंडळांना ऑनलाईन पध्दतीने परवाना देण्यात येणाऱ्या सुविधेची माहितीसह प्रात्यक्षिकासह सादर करण्यात आली.तसेच पर्यावरणपूरक गणोशोत्सव स्पर्धा यावषियी माहिती देण्यात आली तसेच पोलिस विभागाच्यावतीने विविध सूचना देण्यात आल्या.

यावेळी आयुक्त श्री.मंगेश चितळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे , उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, शहर अभियंता संजय कटेकर, महापालिका कार्यक्षेत्रातील सहा पोलिस स्थानकांचे पोलिस निरीक्षक तसेच महापालिका अधिकारी, सिडको, विद्युत वितरण,गणेश मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी बोलताना आयुक्त श्री.मंगेश चितळे म्हणाले, उच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनूसार सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी मंडप परवानगी घ्यावी तसेच जाहिरत फलकांची परवानगी घेऊनच फलक लावावेत, त्याप्रमाणे सहा फूटांच्या आतील गणेश मुर्ती महापालिकेने तयार केलेल्या कृत्रिम तलावांमध्ये विसर्जित करावे. ट्रॅफिकची समस्या सोडविण्यसाठी महापालिकेने रायगड सुरक्षा मंडळाकडून जादा रक्षक घेणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. याबरोबरच निर्माल्य रथामध्ये गणेश मंडळांनी आपले निर्माल्य टाकण्याच्या सूचना आयुक्तांनी उपस्थित गणेश मंडळांना दिल्या. अपघात मुक्त आनंदाने सण साजरा करण्याच्या यादृष्टीने महापालिका तत्पर असल्याचे यावेळी आयुक्तांनी सांगितले. यावेळी बोलताना पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते म्हणाले, गणेश मंडळांनी गणेश मुर्तीची काळजी घेण्याच्या दृष्टीने स्वयंसेवक २४ तास मंडपामध्ये ठेवावे. तसेच सीसीटीव्ही लाववेत , गणेश मंडळांनी आपल्या साऊंड सिस्टीमचा आवाज मर्यादित ठेवण्याविषयीचे आवाहन यावेळी त्यांनी केले.नियमांचे काटेकोर पालन करून व गणेश मंडळांनी पोलिस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच गणेशोत्सवाच्या अनुषंगाने येणाऱ्या विविध विषयांवरती यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे यांनी पर्यावरणपूरक गणोशोत्सवासाठी तयार केलेल्या सप्तसूत्री तसेच पर्यावरणपूरक गणेश उत्सव स्पर्धेची माहिती माहिती दिली. सार्वजनिक गणेश मंडळे व घरगुती सजावट स्पर्धा,मुर्तीदान व कृत्रिम तलावामध्ये बाप्पाचे विसर्जन या महापालिकेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये नागरिकांनी सहभागी होण्याविषयी आवाहन केले. यावेळी गणेश मंडळांनी गणेशोत्सव काळात त्यांना येणाऱ्या विविध समस्या तसेच गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवरती पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील विविध विषयांवरती यावेळी चर्चा करण्यात आली. बैठकिचा समारोप उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केला.

### मंडळांसाठी वेबसाईटची सुविधा

***बैठकीच्या प्रास्ताविकामध्ये उपायुक्त रविकिरण घोडके यांनी शासनाच्या १५० दिवस कार्यक्रमांतर्गत गणेशोत्सव मंडळांना ऑनलाईन पध्दतीने एक खिडकीयोजना अमंलात आणली असल्याचे सांगून यासाठी तयार केलेल्या ऑनलाईन प्रणालीची माहिती दिली. या प्रणालीनूसार वाहतुक पोलीस, पोलीस स्टेशन, अग्निशमन विभाग,मालमत्ता विभाग यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून प्रभाग समिती अ,ब,क,ड,उपविभाग नावडे यांच्यामार्फत मंडप परवानगी देण्यात येणार आहे. या सर्वबाबी एकाच ठिकाणी होणार असल्याचे सांगितले. यासाठी महापालिकेने https:// pandal.maharts.com/ वेबसाईट तयार केली असुन, गणेश मंडळांनी या वेबसाईटवर जाऊन अर्ज सादर करावेत असे आवाहन यावेळी त्यांनी केले.***

## शाडू मातीच्या गणपती कार्यशाळेला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल कल्चरल सेंटरने पनवेल परिसरातील केवळ बाळगोपाळांसाठीच नव्हे तर मोठ्यांसाठीही शाडू मातीच्या गणपती कार्यशाळेचे आयोजन ३ ऑगस्ट रोजी संस्थेच्या सभागृहात केले होते.

संस्थेचे कला विभाग प्रमुख मिलिंद देशमुख यांच्या कल्पनेतून साकार झालेल्या या कार्यशाळेत तब्बल २९ लहान-मोठ्यांनी सहभाग घेतला होता. नागपूर विद्यापीठाचे फाईन आर्टस्चे मास्टर्स असलेल्या प्रवीण पडवळ यांनी या कार्यशाळेत शिबिरार्थींना मार्गदर्शन केले आणि प्रत्येकाकडून गणपतीची एकेक सुंदर मूर्तीही घडवून घेतली. प्रवीण पडवळ यांनी शिल्पकलेचे शिक्षण जे.जे.स्कूल ऑफ आर्ट, मुंबईत घेतले असून ते गेली १८ वर्षे या कला क्षेत्रात कार्यरत आहेत.

प्रारंभी संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार कर्वे यांनी आपल्या प्रास्ताविकात या कार्यशाळेविषयी माहिती दिली. प्रवीण पडवळ यांनी केलेल्या छोट्या गणेशमूर्तीला गुलाबपुष्प अर्पण करून 'वक्रतुंड महाकाय.. हा श्लोक म्हणवून प्रत्यक्ष कार्यशाळेला सुरुवात झाली. या कार्यशाळेनंतर सर्व सहभागी शिबिरार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले.



**अवयवदान जनजागृती पंधरवडा निमित्त सीकेटी कॉलेज येथे मार्गदर्शन करताना**

# वाहेरून येणाऱ्या रेडीमेड गणेशमूर्तींमुळे शाडूच्या मूर्तींसाठी प्रसिद्ध चिरनेर कलानगर संकटात

### पिढीजात मूर्तिकारांच्या व्यवसायावर परिणाम; ग्राहकांची संख्या रोडावली

**उरण : वार्ताहर**

उरण परिसरात बाहेरून पेंटिंग केलेल्या तयार गणेशमूर्ती विक्रीसाठी येत असल्याने, येथील पिढीजात मूर्तिकारांच्या व्यवसायावर चांगलाच परिणाम झाला आहे. येथील पिढीजात कुंभार समाजाच्या मूर्तिकारांचे ग्राहक वर्षागणिक रोडावत चालले आहेत. त्यामुळे येथील मूर्तिकरांचा व्यवसाय अडचणीत आला आहे.

गणपती सणाला अद्यापही महिनाभराचा अवकाश आहे.त्यामुळे पिढ्यानपिढ्या पासून शाडूच्या गणेशमूर्ती तयार करण्याचे काम उरण परिसरातील अनेक ठिकाणी सुरू आहेत.यापैकी चिरनेरचे कलानगर शाडूच्या मुर्तीसाठी प्रसिद्ध आहे.या



कलानगरीतील सुमारे ३० कारखान्यातही शाडू मातीच्या मूर्ती बनविण्याच्या कामाची लगबग सुरू आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चार महिने आधीच येथील मूर्तिकार गणेशमूर्ती तयार करण्याच्या कामाला सुरुवात करतात. मात्र चिरनेर कला नगरीच्या परिसरातच नव्हे तर संपूर्ण उरण तालुक्यात बाहेरून पेंटिंग केलेल्या तयार गणेशमूर्ती (रेडिमेड)विक्रीसाठी येत असल्याने येथील पिढीजात मूर्तिकारांच्या व्यवसायावर चांगलाच परिणाम झाला आहे. येथील पिढीजात कुंभार समाजाच्या मूर्तिकारांचे ग्राहक वर्षागणिक रोडावतच चालले आहेत. त्यामुळे येथील मूर्तिकरांचा व्यवसाय अडचणीत आला आहे.

उरण शहर व खेड्यापाड्यात गणेश मूर्तींच्या विक्रीची अनेक दुकाने थाटली गेली आहेत.तसेच अगदी शाडूच्या मूर्तीपेक्षा निम्म्याहून अधिक कमी दरात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रींच्या रेडीमेड मूर्ती पेण येथून आणून त्यांना रंगकाम करून त्या ग्राहकांना विकल्या जातात.त्यामुळे चिरनेर येथील कला नगरातील कारखान्यातून शाडूच्या मूर्ती घडण्याचे प्रमाण फारच कमी झाले आहे. यामुळे नव्या ग्राहकांबरोबर जुने ग्राहकही मोठ्या प्रमाणावर कमी झाले असल्याची खंत येथील शाडूच्या मूर्ति घडविणाऱ्या व्यावसायिकांकडून व्यक्त केली जात आहे.

मागील पाच पिढ्यांपासून आजपर्यंत फक्त गणेश मूर्ती कारखान्यात शाडू मातीच्याच घडविल्या जातात. त्यामुळे शाडू मातीच्या गणेश मूर्ती पसंत करणारे नवे जुने ग्राहक आमच्या कारखान्यात येऊन दोन महिने आधीच गणेश मूर्ती बुकिंग करतात. ग्राहकांच्या पसंतीच्या फोटो व मागणीनुसार गणेश मूर्ती आम्ही साकारतो. पण बाहेरून येणाऱ्या गणेश मूर्तीमुळे गणेश मूर्तींच्या मागणीत मोठी घट झाली असल्याचे मूर्तिकार भाई चौलकर, सुनील चौलकर आदी व्यावसायिकांनी सांगितले.

यामध्ये दरवर्षी रंग, शाडूच्या मातीचे वाढते भाव, वाढती मजुरी आणि महागाईचाही फटका व्यवसायावर होत आहे.त्यामुळे पिढीजात व्यवसाय आत्ता केवळ मूर्तिकला जोपासण्या पुरताच उरला आहे.

यात खूपच चढउतार आहेत. पण या चढ उताराची पर्वा न करता कला टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे मूर्तिकार गजानन चौलकर व नंदकुमार चिरनेरकर यांनी सांगितले.



पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना उसर्ली ग्रुप.



पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत.



पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.





## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बँकिंग कोर्सेसचे ओरिएंटेशन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.५) स्पर्धा परीक्षा समितीच्या वतीने बँकिंग व आयबीपीएस कोर्ससाठी ओरीएंटेशन सत्राचे आयोजन केले.



या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील संधी, परीक्षेची रचना आणि तयारीची दिशा याबाबत सखोल माहिती देणे हा होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी योग्य दिशादर्शन व सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमात स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षक प्रा. संजय हिरेमठ समन्वयक सीडी देशमुख स्पर्धा परीक्षा केंद्र चांगु काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना विविध मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उस्फूर्त प्रतिसाद देउन भविष्यातील तयारीसाठी नोंदणीही केली. या मार्गदर्शनपर सत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परीक्षेचे स्वरूप, पात्रता व निवड प्रक्रिया समजावून घेतले.

## 'सीकेटी'त देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सी.के.टी. विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातर्फे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज दि.६ ऑगस्ट रोजी एकेरी देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेचे तालुकास्तरीय आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन जे.बी. एस.पी. संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य स्वप्निल ठाकूर तसेच परीक्षक संगीत विशारद गजानन दाते व संगीत विशारद ओमश्री दास नासकर यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेसाठी पनवेल तालुक्यातील तब्बल ३५ शाळांनी सहभाग घेत रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून संगीत विशारद गजानन दाते व संगीत विशारद ओमश्री दास नासकर यांनी काम पाहिले सदर स्पर्धेत स्थायी सतिश मोकल या चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक, एंजल पाटील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर विद्यालयाच्या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक तसेच प्रांजल राकेश ठाकूर या डी. ए .व्हि. पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकाविला.

प्रमुख पाहुणे स्वप्निल ठाकूर यांनी विजेत्यांचे कौतुक करत त्यांनी संगिताचा रियाज नित्यनियमाने चालू ठेवावा, असे मोलाचे मार्गदर्शन केले.



राम प्रहर श्रावणधारा

### बहर नवा !

ऋतू तोच, बहर नवा
श्रावण मला रोज हवा

हिरवे पोपटी गालीचे
मऊ सुंदर गवताचे
सृष्टीचा स्पर्श अनुभवा
श्रावण.......

वाहते झुळ झुळ पाणी
पाय सोडून गावी गाणी
ओढ्यात लाभे हर्ष नवा
श्रावण............

आले पहा फुलपाखरू
रान फुलांत भिरभिरू
स्वप्नांचा मनोहारी थवा
श्रावण...........

रिमझिम पाऊस येतो
नभी इंद्रधनुष्य देतो
सप्तरंगी मोहक ठेवा
श्रावण............

उन्ह सावली खेळ चाले
कमलांनी तळे भरले
श्वासात सुगंध गारवा
श्रावण.........



-गजआनन म्हात्रे, करावे गाव, नवी मुंबई

# कशेळेत शेतकऱ्यांसाठी अर्ध्या दरात इलेक्ट्रॉनिक वस्तूंची विक्री

## दिनेश रसाळ यांचा पुढाकार; आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून प्रशंसा

**नेरळ : प्रतिनिधी**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी कर्जत ग्रामीण मंडख अध्यक्ष दिनेश रसाळ यांच्या कार्याची भरभरून प्रशंसा करत, त्यांना भाजप संघटनेचा मजबूत आधारस्तंभ असे गौरवले. एका उद्घाटन सोहळ्यात बोलताना त्यांनी सांगितले की, कर्जत तालुक्यातील तीनही भाजप मंडळ अध्यक्ष संघटन अधिक बळकट करत असून, केंद्र आणि राज्य सरकारची धोरणे आणि योजना जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहचवत आहेत.

५ ऑगस्ट रोजी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या तसेच भाजप नेते दीपक बेहेरे यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधत दिनेश रसाळ यांच्या पुढाकाराने कर्जत कशेळे येथे इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या दरात विक्रीसाठी स्टॉलचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांसाठी शेतीपंप, गृहिणींसाठी पीठ दळण यंत्र यांसारख्या वस्तू सरकारी सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.टीव्ही, फॅन, मिक्सर, वॉशिंग मशीन, सायकल,मोबाईल ॲक्सेसरीज अशा अनेक घरगुती उपयोगाच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किमतीत नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. मध्यमवर्गीय व गरजू नागरिकांसाठी ही संधी अत्यंत लाभदायक ठरत असून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण म्हणून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.




या स्टॉलचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. भाजप नेते दीपक बेहेरे, कर्जत अध्यक्ष राजेश लाड, नेरळ अध्यक्ष पप्पू मसणे, सरचिटणीस रामदास घरत, सचिन म्हसकर तसेच भाजपचे काशिनाथ रसाळ, बाळा भोईर, महिला पदाधिकारी संगीता हरपुडे, अंकिता भोईर आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामान्य नागरिकांच्या उपयोगी पडणारा वाढदिवस म्हणजेच खरी लोकसेवा, असे मत भाजप आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

या वेळी दिनेश रसाळ म्हणाले, सामान्य जनतेला महागाईच्या काळात थेट फायदा मिळावा यासाठी आम्ही पक्षाच्या नेत्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. कशेळे बाजारपेठेत उभारण्यात आलेल्या या स्टॉलचा लाभ महिनाभर मिळणार आहे. अधिकाधिक नागरिकांनी याचा लाभ घ्यावा म्हणून सांगण्यात आले. ग्रामीण महिलांसाठी हे उपक्रम घरी राहून रोजगाराची संधी निर्माण करणारे ठरणार असून महिला सशक्तीकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, असा विश्वासही रसाळ यांनी व्यक्त केला.

# महसूल सप्ताहानिमित्त डोलवी ग्रामपंचायतीकडून ग्रामस्थांना दाखले

## 'जेएसडब्लू'च्या आरोग्य शिबिराचाही ग्रामस्थांनी घेतला लाभ



**पेण : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने नागरिकांना महसूल विभागाशी निगडित असणारे उत्पन्न दाखले, जातीचे दाखले, वयाचे दाखले, रेशनकार्ड, सातबारा, अशा सर्वच दाखल्यांचे वाटप गावातच करण्यासाठी महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून त्या अनुषंगाने डोलवी येथे दाखले वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील, प्रांतधिकारी प्रवीण पवार यांच्या हस्ते झाले. माजी सभापती सुरेश म्हात्रे, सरपंच परशुराम म्हात्रे, अनिल म्हात्रे, नायब तहसीलदार नितीन परदेशी, प्रसाद कालेकर यांच्यासह ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी महसूल खात्याशी संबंधित सर्व दाखले घरच्या घरी देण्यात पेण तालुका प्रथम क्रमांकावर असल्याचे आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले.

जेएसडब्ल्यू कंपनी व संजीवनी हॉस्पिटलच्या मार्फत याच ठिकाणी नागरिकांचे मोफत आरोग्य शिबिर राबविण्यात आले. यात १९५ नागरिकांनी औषधे व आरोग्य तपासणी करून घेतली. यासाठी सहकार्य करणारे अधिकारी आत्माराम बेटकेकर यांचे आभार मानण्यात आले. सूत्रसंचालन एल.एस. जांभळे यांनी केले.


**ग्रामस्थ, विद्यार्थ्यांना मिळणार प्रवास सुविधा**

डोलवी गावातील जे ग्रामस्थ वयाची ६५ वर्ष पूर्ण केलेली आहेत व जे विद्यार्थी आहेत अशांना ओळखपत्र दाखवून डोलवी ग्रामपंचायतीतर्फे डोलवी ते वडखळ व परत वडखळ ते डोलवी असा प्रवास इलेक्ट्रिक रिक्षातून मोफत होईल. या व्यतिरिक्त असणाऱ्या ग्रामस्थांना केवळ एक रुपया भाडे देऊन वरील प्रवास करण्याची सुविधा पुढील महिन्यापासून सुरू करण्याचा आमचा संकल्प असल्याचे डोलवीचे सरपंच परशुराम म्हात्रे यांनी येथे सांगितले.

# रोह्यात निर्मलाताई आठवले यांचा जन्मशताब्दी सोहळा; स्वाध्याय परिवाराची उपस्थिती

**रोहा : प्रतिनिधी**

स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले प्रवर्तित स्वाध्याय परिवारासाठी ३ ऑगस्ट हा दिवस मंगलमय आणि प्रेरणादायी आहे, कारण मातृसमान निर्मलाताई आठवले यांचा तो जन्मदिवस. ताईच्या जन्मशताब्दीची सुरुवात झाली.



रायगड जिल्ह्यातील साधारण १० तालुक्यांमध्ये हा जन्मशताब्दी सोहळा साजरा झाला. अत्यानंदाची गोष्ट ही की दादांचे जन्मगाव असलेल्या रोहा तालुक्यातही अनेकानेक गावांत स्वाध्याय परिवार विस्तारला आहे आणि ३ ऑगस्टच्या कार्यक्रमाला रोहा येथे झालेल्या कार्यक्रमाला ७,५००पेक्षा जास्त स्वाध्यायी उपस्थित होते. चिंतामणराव देशमुख माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रम झाला, तर पनवेलच्या कार्यक्रमास ५०००पेक्षा जास्त उपस्थिती होती.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अवयवदान दिन साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्याल व फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲण्ड बॉडी डोनेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.४) देहदान दिन साजरा करण्यात आला. याच कार्यक्रमाच्या निमित्ताने एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांनी विविध पोस्टरच्या माध्यमातून जनजागृती केली.




फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांनी अवयवदान व देहदानाबद्दल प्रोत्साहनपर प्रमुख मार्गदर्शन केले. डॉ. प्रतिक कुंडे यांनी नेत्रदानाविषयी माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून दिली. फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲण्ड बॉडी डोनेशनच्या कमिटी मेंबर शुभदा कुडतडकर यांनी नेत्रदानावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲण्ड बॉडी डोनेशन रायगड शाखेचे प्रमुख गिरीश तुळपुळे, समन्वयक कुमार कदम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, प्रा. डॉ. आकाश खोब्रागडे, उपअधिष्ठाता डॉ. सुधाकर बंटेवाड, सहयोगी प्राध्यापक डॉ. देवानंद पवार, सहयोगी प्राध्यापक डॉ. नाझिया खान, अतिरिक्त जिल्हा चिकित्सक डॉ. शितल जोशी, वरिष्ठ निवासी डॉ. प्रतिक कुंडे, सहाय्यक प्रा. डॉ. छत्रपाल राऊत आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजसेवा अधिक्षक चित्रा ठाणगे यांनी केले. अवयवदानाची प्रतिज्ञा वाचन समाजसेवा अधिक्षक नम्रता रणसिंग यांनी केले. उपस्थितांचे आभार समाजसेवा अधिक्षक हर्षा जाधव यांनी मानले. एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांनी अवयवदानपर जनजागृती पथनाट्य सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

# सरस्वती महिला सहकारी पतसंस्था आदर्श पतसंस्थेमध्ये विलीन करण्याचा निर्णय

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुणे कोथरूड येथील सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये विलीनीकरण करण्याचा ठराव आदर्श पतसंस्थेच्या २७व्या वार्षिक सभेत मंजूर करण्यात आले.

आदर्श नागरी सहकारी संस्थेची वार्षिक सभा संस्थेचे अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच क्षात्रेक्य माळी समाज हॉल, कुरूळ, अलिबाग येथे पार पडली. या सभेत हा ठराव मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या पिंपळभाट व पोयनाड या दोन शाखांसाठी स्वामालकीच्या जागा खरेदी करणे, रामराज शाखेसाठी यापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या मोकळ्या प्लॉटवर बांधकाम करून तेथे रामराज शाखेचे कामकाज सुरू करणे, सभासदांना ११ टक्के लाभांश देणे हे ठराव देखील या सभेत मंजूर करण्यात आले.

आदर्शतर्फे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग व जिल्हा पोलीस कल्याण निधीला प्रत्येकी एक लाख रुपये मदतीचे धनादेश देण्यात आले. नाना शंकर शेठ यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने संस्थेमध्ये घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. या निबंध स्पर्धेत रेवस शाखाधिकारी कौस्तुभ म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. चेंढरे शाखाधिकारी रेश्मा पाटील यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. कुरुळ शाखाधिकारी प्रियांका जगताप-वाळंज व चोंढी शाखा सहशाखाधिकारी श्रीराज पावशे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून देण्यात आले.




निबंध स्पर्धेचे परीक्षण सूएसो हायस्कूल कुरुळच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांनी केले. संस्थेचे ज्येष्ठ सभासद सुभाष पानसकर यांनी वयाच्या ७३व्या वर्षी २३ गड व किल्ले यांची ट्रेकिंग केलेल्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सभेपूर्वी याच ठिकाणी सभासद प्रशिक्षण आयोजित केले होते. सहकारी संघ पुणे चे एस.बी. वटाणे यांनी सभासद यांची कर्तव्य, जबाबदारी याविषयी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले.

संस्थेचे संस्थापक सुरेश पाटील यांनी संस्थेतर्फे बँकिंग व सहकाराचे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचा मनोदय मनोगतात व्यक्त केला. संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी संस्थेची आर्थिक स्थिती सभासदांसमोर सादर केली.

या सभेला कैलास जगे, अनंत म्हात्रे, सतीश प्रधान, ॲड. आत्माराम काटकर, विलाप सरतांडेल, ॲड. रेश्मा पाटील, ॲड. वर्षा शेठ, भगवान वेटकोळी, रामभाऊ गोरीवले, महेश चव्हाण, श्रीकांत ओसवाल, संजय राऊत, डॉ. मकरंद आठवले उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन संस्थेचे मुख्याधिकारी उमेश पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संस्थेचे तज्ज्ञ संचालक डॉ. आठवले यांनी मानले.

# डॉ. रूपेश मेंदाडकर यांचा सन्मान

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दिघी कोळीवाडा या श्रीवर्धन तालुक्यातील छोट्याशा गावातून उच्च शिक्षण आणि सेवाभावाच्या वाटेवरून आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी झेप घेणारा सुपुत्र म्हणजेच डॉ. रूपेश रामचंद्र मेंदाडकर. ऑनलाईन प्रोग्राम पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सिंगापूरहून ऑनलाईन सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला

आरोग्यसेवा क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असताना डॉ. मेंदाडकर यांनी अलीकडेच सिंगापूर येथील मेडिग्राड या आरोग्यसेवा केंद्रित ऑनलाईन शिक्षण मंचावरून नवजात बालरोग शास्त्रातील यूकेसीपीडी प्रमाणित १० महिन्यांचा ऑनलाईन प्रोग्राम उत्तम श्रेणीत पूर्ण केला आहे. या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# रातवड विद्यालयात मुला-मुलींसाठी सुरक्षा कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात सखी सावित्री समिती व विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीच्या वतीने नुकतीच विद्यार्थी सुरक्षा व समुपदेशन मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली.

सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार, पोलीस निरीक्षक प्रमोद कदम, पोलीस शिपाई माहेश्वरी सावरकर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

मुलींसाठी चांगला-वाईट स्पर्श, प्रवासात घ्यावयाची दक्षता, स्वसंरक्षणाचे उपाय, संपर्क व विरोध करणे, मोबाईल वापराविषयीचे फायदे-तोटे, सायबर क्राईम इत्यादीविषयी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

पोलीस नरेंद्र बेलदार, प्रमोद कदम, शिपाई महेश्वरी सावरकर यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांनीही मार्गदर्शन करून आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका डॉ.शारदा निवाते यांनी केले.

# श्रीनिवास गडकरी यांच्या बालकविता संग्रहाचे प्रकाशन

**रोहा : प्रतिनिधी**

साहित्यिक रोह्याचे श्रीनिवास गडकरी यांच्या स्वप्नात आला बाप्पा या बालकविता संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. पुण्याच्या बुकमार्क पब्लिकेशन या नामवंत प्रकाशन संस्थेचे प्रकाशन लाभलेल्या या संग्रहात विविध प्रकारच्या चाळीस हून अधिक कविता संकलित केल्या गेल्या आहेत.

साधारण चौदा वयोगटापर्यंतची मुले डोळ्यापुढे ठेवून यातील कविताची निवड केली आहे. यात बडबड गीते, गेय गाणी या शिवाय काही प्रबोधन गीतांचाही समावेश आहे. या कविता संग्रहाविषयी बोलताना श्रीनिवास गडकरी म्हणाले की, माझे हे पंचविसावे पुस्तकं आहे. संस्कारक्षम मुले डोळ्यासमोर ठेवून कवितांची निवड केली आहे, जेणे करून इंग्रजी माध्यमात शिकत असलेल्या मुलांनाही कविता वाचताना अडचण येणार नाही. कमी होतं चाललेल्या वाचन काळात या पुस्तकाने मुले थोडी तरी पुन्हा शब्दाकडे आकर्षित झाली तरी मला आनंद होईल.

नवीन काव्यसंग्रहाबद्दल श्री. गडकरी यांचे डोंबिवलीचे प्रसिद्ध कवी विजय जोशी, रत्नागिरीचे आश्रफ मुकरी, कल्याणचे श्रीकांत पेटकर, पनवेलचे रवींद्र सोनावणे यांनी अभिनंदन केले. पुस्तकाबद्दल अजून जाणून घ्यायचे असेल तर ९१३०८६१३०४ या नंबर वर संपर्क करावा, असे कळविण्यात आले आहे.

# सहकारी पतसंस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५चे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड तसेच रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयाच्या ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेज सभागृहात झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याचे उपनिबंधक (दुग्ध) श्रीकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे.टी. पाटील होते.

या वेळी श्रीकांत पाटील म्हणाले की, रिझर्व बँक ज्या पद्धतीने सहकारी बँकांवर मार्गदर्शक तत्वे व निर्बंध लागू करते, त्याच धर्तीवर आता सहकार विभागही पतसंस्थांवर धोरणात्मक निर्बंध व मार्गदर्शक तत्वे लादण्याच्या प्रक्रियेत आहे. भविष्यात सहकारी बँका व पतसंस्था यामध्ये फारसा फरक उरणार नाही. याच अनुषंगाने त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून पतसंस्थांनी कार्यक्षमता वाढवावी व तांत्रिक प्रगतीच्या दिशेने पावले उचलावीत.

सन २०१३-१४पासून सहकारी संस्थांना शिक्षण निधी द्यावी लागत नाही, मात्र सहकार कायद्यातील कलम ६८मध्ये शासन दुरूस्ती करण्याच्या विचारात असून भविष्यात महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थांना शिक्षण निधी द्यावा लागणार असल्याचे सुतोवाच ॲड.जे.टी.पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात केले.

प्रशिक्षणात जिल्ह्यातील ६०हून अधिक पतसंस्थांचे सुमारे १५० प्रतिनिधी सहभागी झाले होते. प्रा. ॲड. महेंद्र खरात यांनी संस्था सशक्तीकरणासाठी नवकल्पना व आधुनिक व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सहकारी संघाचे प्रा. एस.बी. वटाणे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार महासंघाचे सचिव योगेश मगर यांनी केले.

# कर्जत रेल्वे पेन्शनर्स असोसिएशनची वार्षिक सभा



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील ब्राह्मण सभागृहात कर्जत रेल्वे पेन्शनर्स असोसिएशनच्या वार्षिक सभेचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ सदस्य जे.एम. मिर्झा यांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करून सभेची सुरुवात करण्यात आली.

या वेळी प्रमुख पाहुणे ठाणे रेल्वे पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप आठवले म्हणाले की, आम्ही सर्वांच्या समस्या सुटव्यात यासाठी प्रयत्न करीत आहोत, मात्र तुमची साथ तितकीच महत्त्वाची आहे. अनेकांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळवून देण्यात यश येत आहे. काही जण सभासद होण्यास तयार नाहीत. तरीही त्यांची कामे आम्ही करीत आहोत. काम झाल्यावर त्यांना वाटले तर सदस्य व्हावे असे आमचे त्यांना सांगणे आहे. आठव्या वेतन आयोगाचा लाभ आपल्याला मिळणार आहे.

असिफ मिर्झा असोसिएशचे अध्यक्ष जे.डब्लू. मलातपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेस उपाध्यक्ष चंद्रकांत ओंबळे, कार्याध्यक्ष रामप्रकाश परदेशी, सचिव प्रकाश पाटील, खजिनदार एन.एच. दहिवलीकर, रमेश राव, संदीप कोल्हे उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्ष मलातपुरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर जमा-खर्चाला मंजुरी देण्यात आली.

या वेळी आत्माराम निघोजकर, रामचंद्र कडू, बळीराम भालेकर आदींनी विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात असिफ मिर्झा यांनी सांगितले की, आपल्या तालुक्यात सुमारे दीड हजार रेल्वे निवृत्त कामगार आहेत, मात्र आपल्याला असोसिएशनचे सदस्य खूप कमी आहेत. अनेक जणांच्या अनेक अडचणी आहेत. निवृत्त कर्मचारी मयत झाल्यावर त्यांच्या वारसांना निवृत्ती वेतन मिळण्यात अडचणी येतात. मयत निवृत्त कामगाराची कुमारिका कन्या, घटस्फोट घेतलेली मुलगी किंवा गतिमंद अपत्य असल्यास त्यालाही निवृत्ती वेतन मिळू शकते, पण याची माहिती अनेकांना नसल्याने त्यांना लाभ मिळत नाही. काहींना दहा-बारा वर्षानंतर निवृत्ती वेतन मिळाले आहे असे अनेक जण असतील, परंतु त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. अशा कर्मचाऱ्यांशी संपर्क करून त्यांना सदस्य करून घ्यावे आणि एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार करावा व समन्वय साधावा.

# कसोटी क्रमवारीत सिराजची मोठी झेप!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीच्या ताज्या कसोटी गोलंदाजी क्रमवारीत इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला मोठा फायदा झाला आहे, तर दुसरीकडे भारतीय संघाचा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने फलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-५मध्ये स्थान मिळवले आहे.

इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात नऊ बळी घेत भारताला विजय मिळवून देण्यासह या संपूर्ण मालिकेत २३ बळी घेणारा सिराज आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम अशा १५व्या स्थानावर पोहचला आहे. यापूर्वी सिराज २७व्या स्थानी होता आणि आता त्याला १२ स्थानांचा फायदा झाला आहे. याआधी जानेवारी २०२४मध्ये सिराज १६व्या स्थानावर पोहचला होता. याशिवाय प्रसिद्ध कृष्णाने मालिकेतील सुरुवातीच्या काही सामन्यांमध्ये भरपूर धावा दिल्या होत्या, परंतु शेवटच्या सामन्यात तोच खरा नायक म्हणून उदयास आला. याच उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याचे रेटिंग वाढून आता ३६८ झाले आहे. कृष्णाने यावेळी तब्बल २५ स्थानांची झेप घेत थेट ५९वे स्थान गाठले आहे. ही त्यादेखील आतापर्यंतची सर्वोच्च क्रमवारी आहे.

बुमराहचे सध्या ८८९ रेटिंग आहे. पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या गोलंदाजांच्या रेटिंगमध्ये मोठे अंतर आहे. सध्या कसोटी क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर दक्षिण आफ्रिकेचा कागिसो रबाडा असून त्याचे रेटिंग ८५१ आहे. त्यामुळे बुमराहच्या अव्वल स्थानाला सध्या कोणताही धोका नाही.

भारत-इंग्लंड कसोटी मालिकेतील अखेरच्या सामन्यानंतर आयसीसीने प्रसिद्ध केलेल्या ताज्या क्रमवारीत इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट फलंदाजीत अव्वल स्थानी कायम आहे. त्याचे रेटिंग ९०८ अंकांवर पोहोचले आहे.

### यशस्वी जैस्वालची टॉप-५मध्ये एन्ट्री

इंग्लंडविरुद्धच्या अखेरच्या कसोटी सामन्यात शानदार शतक झळकावणाऱ्या यशस्वी जैस्वालला त्याच्या कामगिरीचा फायदा ताज्या क्रमवारीत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याने तीन स्थानांची झेप घेत पुन्हा एकदा पाचव्या क्रमांकावर आपले स्थान पक्के केले आहे. त्याचे रेटिंग ७९२ पर्यंत वाढले आहे. जैस्वालच्या या प्रगतीमुळे टेंबा बावुमा, कामिंदू मेंडिस आणि ऋषभ पंत यांना प्रत्येकी एका स्थानाचे नुकसान झाले आहे. बावुमा (७९०) सहाव्या, मेंडिस (७८१) सातव्या, तर पंत (७६८) आठव्या क्रमांकावर घसरले आहेत.

## खोपोलीत 'आरडीसीए'चे पंच शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने नुकतेच खोपोली येथे जिल्ह्यातील क्रिकेट पंचांच्या दुसऱ्या सत्राच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला प्रतिसाद लाभला.

शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी माजी रणजीपटू व बीसीसीआयचे विद्यमान पंच हर्षद रावले, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे, क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा उपस्थित होते. शिबिरात जिल्ह्यातील ५० पंचांनी सहभाग घेतला असून शिबिर एकूण १०० दिवस ऑनलाइन व प्रत्यक्ष कार्यशाळा वर्ग घेऊन सुरू आहे. रायगड पंच पॅनलची परीक्षा २३ ऑगस्ट रोजी होणार आहे.

खोपोली येथील पंच शिबिरात एमसीसी क्रिकेट लॉ, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या एकदिवसीय, टी-२० व मल्टी डेज क्रिकेट सामन्यांच्या नियमांसह अन्य नवीन नियमांचे प्रात्यक्षिक काशी क्रिकेट अकॅडमीच्या टर्फवर करून दाखवण्यात आली व सर्व नियम समजावून सांगण्यात आले.

आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे, सदस्य कौस्तुभ जोशी यांनी गतवर्षीप्रमाणे आरडीसीएतर्फे सर्व वयोगटातील मुला-मुलींच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून सर्व मिळून जवळपास ३२५ सामन्यांचे नियोजन असल्याची माहिती दिली तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित १६ वर्षांखालील मुलांच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेतील १५ दोनदिवसीय सामन्यांचे आयोजन रायगडात करण्यात आल्याचे सांगितले.

यंदाच्या हंगामासाठी आरडीसीएतर्फे विविध वयोगटातील व खुल्या गटातील मुला-मुलींचा मिळून किमान ५०० सामन्यांचा आराखडा तयार करण्यात असल्याची माहिती कौस्तुभ जोशी यांनी दिली.

शिबिरास आरडीसीएचे सदस्य ॲड. पंकज पंडित, शंकर दळवी, विनोद सोळंकी उपस्थित होते. यशवंत साबळे यांनी आपला हॉल विनामूल्य दिल्याबद्दल आरडीसीएतर्फे त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. जिल्ह्यात जास्तीत जास्त प्रशिक्षित पंच तयार व्हावेत यासाठी असोसिएशन कायम प्रयत्नशील असणार असल्याचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी माध्यमांना सांगितले.

## राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत पनवेलचे खेळाडू चमकले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग असोसिएशनतर्फे जळगाव येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धेत पनवेलच्या खेळाडूंनी चमक दाखवत रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

या स्पर्धेत अहाना सोमण, सई कारंडे आणि बतूल साखरवाला यांनी रौप्यपदके, तर अनन्या डिंगोरकर हिने कांस्यपदक जिंकले. या खेळाडूंना प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे मार्गदर्शन लाभले. विशेषतः महात्मा स्कूल ऑफ अकॅडेमी पनवेलची विद्यार्थिनी असलेल्या अहानाने तिच्या पहिल्याच राज्यस्तरीय स्पर्धेत हे यश मिळवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

स्पर्धेत ११ वर्षांखालील वयोगटात रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारी अहाना ही एकमेव खेळाडू होती. उपांत्य फेरीत तिने चंद्रपूरच्या आर्ची बचनपल्लीबार हिला मात देऊन अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. फायनलमध्ये तिचा सामना नागपूरच्या आदिती महाजन सोबत झाला, ज्यात तिला कडवा प्रतिकार करूनही पराभव पत्करावा लागला, पण पहिल्याच स्पर्धेत रौप्यपदक जिंकण्याची तिची कामगिरी कौतुकास्पद आहे. त्यामुळे तिचे अभिनंदन होत आहे.

## सूर्यकुमार यादव मैदानावर परतला; नेटमध्ये सराव

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार आणि स्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादव दुखापतीतून सावरून पुन्हा एकदा मैदानावर परतला आहे. जर्मनीमध्ये हर्नियावर यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यानंतर सूर्याने बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये (एनसीए) सरावाला सुरुवात केली आहे. आगामी आशिया चषक स्पर्धेच्या दृष्टीने त्याची ही वापसी भारतीय संघासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बीसीसीआयची वैद्यकीय टीम सूर्याच्या तंदुरुस्तीवर आणि वर्कलोडवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्याचा सराव हळूहळू वाढवला जाणार असून ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया चषकापूर्वी तो पूर्णपणे तंदुरुस्त होईल, अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे गेल्या तीन वर्षांतील सूर्याची ही तिसरी मोठी शस्त्रक्रिया आहे. यापूर्वी २०२३मध्ये घोट्याच्या आणि २०२४मध्येही स्पोर्ट्स हर्नियाच्या शस्त्रक्रियेला त्याला सामोरे जावे लागले होते. या दुखापतींवर मात करून त्याने पुन्हा सरावाला सुरुवात केल्याने संघ व्यवस्थापनाला मोठा दिलासा मिळाला आहे.

सूर्यकुमार यादवने आयपीएल २०२५मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळताना जबरदस्त कामगिरी केली होती. त्याने ७१७ धावा करत संघाला प्लेऑफमध्ये पोहोचवण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. आता तो पूर्णपणे तंदुरुस्त होऊन संघात परतल्यास भारतीय संघाची मधली फळी आणखी मजबूत होईल.




सौजन्य : श्री. सुरेश पाटील (अध्यक्ष : जेएनपीए जनरल कामगार संघटना)


## डीएसपी सिराजला ना विश्रांती; ना वर्कलोड मॅनेजमेंट!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिल याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने आपली पहिली कसोटी मालिका जवळपास यशस्वीरित्या पार पाडली आहे. ज्या मालिकेत प्रत्येक सामन्यात पराभवाचे सावट होते, त्या मालिकेत भारताने दोन सामने जिंकण्यात यश मिळवले. भारतीय संघाच्या फलंदाज आणि गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली, परंतु या सर्वांमध्ये एक खेळाडू असा आहे, जो खऱ्या अर्थाने नायक ठरला. त्याने मालिकेतील पाचही सामने खेळले आणि इंग्लंडचा अखेरचा बळी घेत भारताला मालिका बरोबरीत सोडवण्यात सिंहाचा वाटा उचलला.

द ओव्हलच्या ऐतिहासिक मैदानावर खेळल्या गेलेल्या अखेरच्या कसोटी सामन्यात जेव्हा इंग्लंडला विजयासाठी केवळ सहा धावांची आवश्यकता होती, तेव्हा मोहम्मद सिराज गोलंदाजीसाठी आला आणि त्याच्यासमोर गस ॲटकिन्सन उभा होता. ॲटकिन्सन मूळतः एक गोलंदाज असला तरी तो उत्तम फलंदाजीसाठीही ओळखला जातो. सर्वांना कल्पना होती की ॲटकिन्सनने एक जरी मोठा फटका लगावला, तर सामना तिथेच संपला असता, परंत, सिराजने त्याच्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर गस ॲटकिन्सनला यॉर्कर फेकला आणि त्यांच्या दांड्या गुल केल्या. यासह भारताने रोमहर्षक विजयाची नोंद केली. धावांच्या बाबतीत भारताने हा सर्वात कमी फरकाने मिळवलेला विजय ठरला आहे.

मोहम्मद सिराजने या सामन्यात १९० धावा देत एकूण नऊ बळी मिळवले. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सिराजची सर्वात विशेष बाब म्हणजे त्याने मालिकेतील पाचही सामने खेळले. त्याला ना विश्रांती देण्यात आली, ना त्याच्यासाठी 'वर्कलोड मॅनेजमेंट'चा (कार्यभाराचे व्यवस्थापन) विचार केला गेला. उल्लेखनीय बाब म्हणजे यापूर्वी जेव्हा भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा दौरा केला होता, तेव्हादेखील सिराजने पाचही सामने खेळले होते. म्हणजेच भारताने खेळलेले मागील दहाही कसोटी सामने सिराज खेळला आहे आणि त्याने आपले सर्वस्व पणाला लावून संघाला विजय मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

सिराज या मालिकेत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला. त्याने पाच सामन्यांच्या ९ डावांमध्ये २३ बळी आपल्या नावे केले. या दरम्यान सिराजने एकूण १८५.३ षटके (१११३ चेंडू) फेकली. यादरम्यान त्याची सरासरी ३२.४३ आणि स्ट्राइक रेट ४८.३९ राहिला. सिराज इतर गोलंदाजांपेक्षा किती पुढे होता याचा अंदाज यावरून लावता येतो. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर जोश टंग आहे, ज्याने तीन सामन्यांत १९ बळी घेतले. बुमराहने तीन सामन्यांत १४ बळी टिपले.

सिराजने जून २००२नंतर इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत कोणत्याही भारतीय वेगवान गोलंदाजापेक्षा अधिक चेंडू टाकले आहेत. सिराजने इंग्लंडमध्ये तब्बल सात वेळा एका डावात चार बळी मिळवण्याचा पराक्रम केला आहे. इंग्लंडमध्ये अशी कामगिरी करणारा तो पहिलाच आशियाई गोलंदाज ठरला. त्याने श्रीलंकेचा मुथय्या मुरलीधरनचा विक्रम मोडला आहे, ज्याने इंग्लंडमध्ये सहा वेळा एका डावात चार बळी मिळवण्याची कामगिरी केली होती.

## आम्ही कधीही हार मानणार नाही -गंभीर



**लंडन :** भारतीय संघाने इंग्लंडविरुद्ध ओव्हल क्रिकेट मैदानावर झालेल्या कसोटी सामन्यात ६ धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. या विजयासह भारतीयाने पाच सामन्यांची मालिका २-२ अशी बरोबरीत सोडवली. ओव्हल कसोटीतील या अविस्मरणीय विजयानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी संघाचे कौतुक केले आहे.

या ऐतिहासिक विजयानंतर गंभीर यांनी लिहिले, आम्ही काही सामने जिंकू, काही हरू. पण आम्ही कधीही शरणागती पत्करणार नाही. शाब्बास मुलांनो! गंभीर यांची ही पोस्ट एक्सवर जबरदस्त व्हायरल झाली आहे. गंभीर यांची संपूर्ण मालिकेदरम्यान एक अतिरिक्त फलंदाज खेळवण्याची रणनीती वादात सापडली होती, पण ते ठाम राहिले. कर्णधार शुबमन गिलने ओव्हल कसोटीतील विजयानंतर आपल्या प्रशिक्षकाचे उघडपणे समर्थन केले.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com